रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १६
www.ramprahar.com
शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## उत्तर भारतात पावसाचे थैमान; केदारनाथमध्ये ढगफुटी



**नवी दिल्ली** : मुसळधार पावसामुळे केरळमधील अनेक भागांमध्ये पूर आला आहे. वायनाड जिल्ह्यात भूस्खलन होऊन २५०हून अधिक लोकांचा बळी गेला आहे. ही घटना ताजी असतानाच आता उत्तर भारतातही तशीच स्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे दिल्लीच्या अनेक भागांमध्ये पाणी साचले आहे. त्याचबरोबर उत्तराखंडमध्येही अतिवृष्टी चालू आहे. केदारनाथला जाणाऱ्या मार्गावर लिनचोलीजवळ ढगफुटीची घटना घडली. त्यामुळे काहीच क्षणात मंदाकिनी नदीची जलपातळी वाढली. जोरदार पावसामुळे ओढे, नालेही तुडुंब भरून वाहताहेत तसेच केदारनाथला जाणारी पदयात्रा विस्कळीत झाली आहे. पदयात्रेच्या मार्गावरच ढगफुटी झाल्याने काही तीर्थयात्रेकरू अडकल्याचे वृत्त आहे. प्रशासनाकडून मदतीची कार्यवाही सुरू झाली आहे.

अंतरंग
पीक विम्यापोटी शासन भरणार ४७२५ कोटींचा हिस्सा/२
कार स्वस्तात देतो सांगून फसवणूक; आरोपीला अटक/५
रेड रन स्पर्धेत यश म्हात्रे, पौर्णिमा म्हात्रे प्रथम/८

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विविध योजनांचा आढावा

## नागरिकांना लाभ मिळवून देण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जल जीवन मिशन योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणि मुख्यमंत्री वयश्री योजनेची आढावा सभा गुरुवारी (दि. १) पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झाली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या योजनांचा आढावा घेतला. जल जीवन मिशनच्या कामांमधील समस्या लवकरात लवकर दूर करून या योजनेचा नागरिकांना लाभ मिळाला पाहिजे यासाठी उपाययोजना करा, अशा सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिल्या.



या सभेला रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांच्यासह विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक, अंगणवाडी आणि आशा सेविका, महिला बालविकास खात्याचे अधिकारी, गटविकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# घोटाळेबाज विवेक पाटील यांना सशर्त जामीन

**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनीष पितळे यांनी गुरुवारी (दि.१) ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीपत्रावर जामीन मंजूर केला तसेच त्यांना प्रत्येक महिन्याच्या सोमवारी ईडीच्या कार्यालयात हजेरी लावण्याचे आणि न्यायालयाच्या कामकाजावेळी उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

**कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांनी बनावट खात्याद्वारे लोकांचे पैसे खाल्ले. ईडीने त्यांच्यावर कारवाई करून गुन्हा दाखल केला, त्यांना अटक केली, पण अद्याप खटला न्यायालयात सुरू झालेला नाही. त्यामुळे जामीन मिळण्यासाठी सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा फायदा त्यांना मिळाला, मात्र ज्या लोकांना अद्याप त्यांचे पैसे मिळाले नाहीत त्यांना आणि ज्यांचे पैसे विमा संरक्षण व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनच्या नियमानुसार मिळाले त्यांनाही असे वाटते की, हा खटला लवकरात लवकर सुरू व्हावा. त्यासाठी आता मी प्रयत्न करीन.**
**–प्रशांत ठाकूर, आमदार**


रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार २०१९–२०मध्ये कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे ऑडिट करण्यात आले. त्या ऑडिटमध्ये बँकेचे तत्कालीन चेअरमन विवेक पाटील हे बनावट खात्याद्वारे त्या बँकेतून पैसे काढत होते आणि ते कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट आणि कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीत टाकत होते, असे आढळून आले. बँकेचे अध्यक्ष व संचालकांनी रक्कम स्वतःच्या खात्यात वर्ग केल्यानंतर ईडीने याबाबत मनी लॉण्डरिंग अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. **(पान २ वर..)**

# मराठमोळ्या स्वप्नील कुसाळेने रचला इतिहास

## ऑलिम्पिक नेमबाजीत कांस्यपदक जिंकले

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताच्या स्वप्नील कुसाळेने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास रचला आहे. त्याने नेमबाजीत ५० मीटर रायफल स्पर्धेत थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले. खाशाबा जाधव यांच्यानंतर ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारा स्वप्नील हा महाराष्ट्राचा दुसरा खेळाडू ठरला आहे.



स्वप्नील कुसाळे हा कोल्हापूरमधील करवीर तालुक्यातील कांबळवाडी येथील रहिवासी असून शेतकरी कुटुंबातील आहे. ऑलिम्पिकमधील यशाबद्दल स्वप्नीलचे सर्वस्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

**पदक जिंकून खूप आनंद झाला. मला पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे आभार! आई–वडिलांचे आभार मानण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. फायनलची तयारी करण्यासाठी वेळ कमी होता. पुढच्या ऑलिम्पिकमध्येही माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेन.**
**–स्वप्नील कुसाळे**

# पूजा खेडकर यांना धक्का; अटकपूर्व जामीन फेटाळला



**नवी दिल्ली** : वादग्रस्त माजी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्यावर पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यासंदर्भात त्यांनी दिल्लीच्या पटियाला कोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, मात्र हा अर्ज गुरुवारी (दि. १) न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे खेडकर यांच्या अटकेची शक्यता आहे.

पूजा खेडकर यांच्याविरोधात दिल्ली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही क्रिमीलेअर सुविधेचा लाभ घेऊन ओबीसी कोट्यातून अर्ज केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याशिवाय बेकायदेशीरपणे दिव्यांग असल्याची चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

# अविनाश धर्माधिकारी यांचे उद्या मार्गदर्शन सत्र व विद्यार्थी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून माजी आयएएस अधिकारी आणि चाणक्य मंडल परिवारचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन सत्र व विद्यार्थी संवाद कार्यक्रम शनिवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आला आहे.



अविनाश धर्माधिकारी हे भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी अधिकारी आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरविषयक अनेक पुस्तके लिहिली आहेत. आयुष्य घडविण्याच्या दृष्टिकोनातून इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन आणि संवाद लाभणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला हा कार्यक्रम खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च महाविद्यालयात होणार आहे. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगडच्या विजेत्या बॅडमिंटन संघातील खेळाडूंचा सत्कार

## ‘बीओआर’ अध्यक्ष परेश ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडच्या बॅडमिंटन संघटनेकडून खेळणाऱ्या मुलींच्या संघाने अहमदनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. या संघातील खेळाडूंचा रायगड बॅडमिंटन ऑर्गनायझेशन (बीओआर)चे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३१) सत्कार करण्यात आला.



रायगडचे मुले व मुली अशा दोन्ही संघांनी अहमदनगर येथे झालेल्या योनेक्स–सनराईज स्व. श्रीमती संजिवनी कुलकर्णी स्मृती महाराष्ट्र अंतर्गत अनुक्रमे १५ आणि १७ वर्षांखालील राज्य आंतरजिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतला व चमकदार कामगिरी केली. मुलींनी अंतिम फेरीत पुण्याचा पराभव करून यशाचा सिलसिला कायम ठेवला आणि २०१२मध्ये ‘बीओआर’च्या स्थापनेनंतरचे पहिले विजेतेपद नोंदवले.

या पार्श्वभूमीवर बुधवारी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये विजेत्या मुलींच्या संघाचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे २० ते २५ ऑगस्ट या कालावधीत चीनमधील चेंगडू येथे होणाऱ्या बॅडमिंटन आशिया अंडर १५ ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल गाथा सुर्यवंशी हिला १० हजार रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास उपाध्यक्ष शिवा काराइल, सचिव डॉ. डेव्हिड अल्वारिस, उपसचिव प्रशांत मुखर्जी, खजिनदार नरेंद्र जोशी, सदस्य प्रमोद काराइल, भार्गव ठाकूर, प्रशिक्षक योगेश पाटील, मयुरेश पाटील यांच्यासह कार्यकारी सदस्य, क्रीडा प्रभारी आदी उपस्थित होते.

या वेळी परेश ठाकूर यांनी आपले खेळाडू हे चांगली मेहतन घेत आहेत. त्यामुळे बॅडमिंटन ऑर्गनायझेशन रायगड आणि रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची शान वाढत असल्याचे गौरवोद्गार काढले.






# रायगडात बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण

### २९६ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण परिसरातील महिला आता स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून स्वतः चे सक्षमीकरण करीत परिवर्तनाच्या दिशेने पाऊल टाकताना दिसत आहेत. जिल्ह्यात २० हजार ४७९ महिला बचत गट कार्यरत असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात फिरता निधी, जोखीम प्रवणता निधी, स्टार्टअप निधी, व्यवसायासाठी विविध बँकांकडून कर्ज असा २९६ कोटी ३४ लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.



बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्रित येऊन व्यवसाय करीत असल्याने महिलांमध्ये उद्योजकता निर्माण झाली आहे. या चळवळीने ग्रामीण भागातील प्रगतशील विशेषतः महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. जिल्ह्यात एकूण २० हजार ४७९ बचत गटांची नोंदणी असून त्यांच्या माध्यमातून महिलांना आत्मविश्वास, आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. त्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या सक्षमीकरणाचे धोरण स्वीकारल्याची माहिती जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आणि ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी दिली.

#### ■ बचत गटांना कोट्यवधींचा निधी

*रायगड जिल्ह्यात २० हजार ४७९ महिला बचत गट कार्यरत असून त्यापैकी १४ हजार ३० गटांना फिरत्या निधीच्या स्वरूपामध्ये १० हजार ते ३० हजार रुपयांपर्यंत निधी देण्यात आला आहे. याशिवाय ८२ बचत गटांना एक कोटी २४ लाख जोखीम प्रवणता निधी, सहा हजार २९७ समुहांना व्यवसायासाठी २४७ कोटी ९२ लाख इतके कर्ज विविध बँकांकडून उपलब्ध करून देण्यात आले आहे.*

#### ग्रामसंघ स्थापन करण्याचे निर्देश

*रायगड जिल्ह्यात २० हजार ४७९ बचत गट नोंदणीकृत असून अनेक बचत गट एकत्र येऊन ग्रामसंघ स्थापन करण्यात येत आहे. असे जिल्ह्यात एकूण ९३० ग्रामसंघ स्थापन करण्यात आले आहेत. ज्या बचत गटांनी एकत्रित येऊन ग्रामसंघ स्थापन केला नाही अशा गटांचे ग्रामसंघ स्थापन करण्याची प्रक्रिया हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत तसेच जिल्हा परिषद गट निहाय प्रभागसंघ स्थापन करण्यात येत असून जिल्ह्यात ५९ प्रभागसंघ स्थापन करण्यात आले आहेत.*

**रायगड जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातर्फे महिला बचत गटांची बांधणी व पुनर्बांधणी करणे, व्यवसाय प्रशिक्षण देणे, आर्थिकदृष्ट्या बचत गटांना सक्षम करणे हा प्रमुख उद्देश आहे. बचत गटांना फिरता निधीसह व्यवसाय सुरू करण्यासाठी बँका कर्ज उपलब्ध करून देत आहेत. यामुळे बचत गटातील महिला विविध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत.**

**-डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

## गोवंशीय मांस घेऊन जाणारा टेम्पो पकडला; दोघांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील कर्जत-चौक रस्त्यावर गोवंशीय मांस घेऊन जाणारा टेम्पो स्थानिकांच्या सतर्कतेमुळे पकडला गेला आहे. त्या टेम्पोमध्ये तब्बल दीड टन गोमांस जप्त करून चालक आणि क्लिनर या दोघांना अटक केली आहे. या आठवड्यातून कर्जत पोलिसांची ही दुसरी कामगिरी आहे.

चौक-कर्जत रस्त्यावर कोल्हापूर वाडा या हॉटेलच्या समोर (एमएच ०३ डीव्ही ४१८७) हा टेम्पो बंद पडला होता. त्या टेम्पोला टोईंग करून नेण्यासाठी चालक प्रयत्न करीत होता, मात्र त्या गाडीमधून दुर्गंधी येत असल्याने स्थानिक तरुणांनी त्याबाबत कर्जत पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सतीश शिंदे तसेच हवालदार समीर भोईर, जयवंत काटे आणि पोलीस नाईक संतोष साळुंखे तेथे पोहचले. त्यांनी घटनास्थळी त्या टेम्पोची पाहणी केली असता त्या टेम्पोत गोमांस असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी टेम्पोचा चालक आणि क्लिनर या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी केली असता पनवेल येथून घेऊन जात असल्याची कबुली दिली.

पोलिसांनी संबंधित टेम्पोमधील मांस कर्जत खोपोली रस्त्यावर नष्ट करण्यासाठी नेले. तेथे जेसीबी मशीन यांच्या साहाय्याने खड्डा खोदून तेथे ते गोमांस टाकण्यात आले आणि ते सर्व दीड टन गोमांस नष्ट करण्यात आले.

या प्रकरणी कर्जत पोलिसांनी मुंबई अंधेरी आणि मुंबई भांडुप येथील दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे. त्या दोघांवर कर्जत पोलीस ठाण्यात कारवाई केली आहे.

## कुंडलिका नदीत उडी घेतलेल्याचा शोध सुरूच

### महाड, माणगाव व रोह्यातील बचाव पथकांना पाचारण

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी पुलावरून बुधवारी (दि.३१) सकाळी ९.३० वा.च्या सुमारास कुंडलिका नदीच्या पात्रात अज्ञाताने उडी मारल्याची घटना घडली होती. त्याचा तपास युद्धपातळीवर सुरू करण्यात आला, परंतु सलग दुसऱ्या दिवशी गुरुवारी (दि.१) संध्याकाळपर्यंत त्याचा शोध लागला नव्हता.



तालुक्यातील कुंडलिका नदीपात्रात रोहा अष्टमी पुलावरून बुधवारी अज्ञात व्यक्तीने उडी मारली होती. ही घटना कळताच रोहा उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी रोहा पोलीस स्टेशनची टीम व आपत्कालीन पथकाने युद्धपातळीवर अज्ञात इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

कुंडलिका दुथडी भरून वाहत होती. त्यामुळे शोध घेण्यास आपत्कालीन टीमला अडथळे येत होते. गुरुवारी पोलीस निरीक्षक देविदास मुपडे त्यांची १२ जणांची टीम, माणगाव येथील साळुंखे रेस्क्यू टीम, कोलाड येथील एसव्हीआरएसएस रेस्क्यू टीम त्या व्यक्तीचा शोध घेत आहेत.

## पेणचे प्रसाद भोईर भाजपमधून पदमुक्त

**पेण : प्रतिनिधी**


पेण विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख प्रसाद भोईर यांची नियुक्ती रद्द करून त्यांना पदमुक्त करण्यात आले असल्याचे पत्र दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी प्रसार माध्यमांना दिले आहे.

गेल्या महिनाभरापासून प्रसाद भोईर हे गावोगाव, वाड्या-वस्त्यांवर जाऊन बैठका घेत आहेत व आपणच आमदारकीचे उमेदवार असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे पक्षाची शिस्त बिघडत असल्याने ही कारवाई केली आहे.

## कार्लेखिंडीत अवजड वाहने बंद पडल्यामुळे वाहतूक ठप्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-पेण मार्गावर कार्लेखिंडीत गुरूवारी (दि. १) पहाटे ५.३० वा. दोन वाहने बंद पडल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. त्यानंतर वाहतूक कनकेश्वरमार्गे वळविण्यात आली होती. दुपारनंतर बंद पडलेली वाहने बाजूला करण्यात आल्यानंतर कार्लेखिंडीतून वाहतूक सुरू करण्यात आली.



कार्लेखिंडीतील एका अवघड वळणावर गुरूवारी ट्रक बंद पडला. त्यामुळे या मार्गावरून एकेरी वाहतूक सुरू होती. सकाळी ११ वा.च्या सुमारस जेएसडब्ल्यू कंपनीतल कामगारांना अलिबगाकडे घेऊन जाणारी बस याच वळणावर फसली. त्यामुळे दोन्ही बाजूकडची वाहतूक ठप्प झाली. या मार्गावरील वाहतुक कनकेश्वरमार्गे वळविण्यात आली होती. दुपारी क्रेनच्या सहाय्याने बस बाजूला करण्यात आली. दुपरी ३.३० वा. कार्लेखिंडीतून वाहतूक सुरू करण्यात आली.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सुलभ अर्ज प्रक्रियेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी १ ऑगस्टपासून www.ladkibahin.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी दिली.

ज्या लाभार्थ्यांनी नारिशक्तीदूत ॲपवर अर्ज भरले आहेत त्यांना पुन्हा या पोर्टलवर अर्ज भरण्याची गरज नाही, ज्या पात्र इच्छुक लाभार्थांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत त्या लाभार्थांनी या संकेतस्तळावर जाऊन आपले अर्ज भरावेत www.ladkibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेलमधून विवाहिता बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

राहत्या घरातून बँकेत जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

अनिता भगत (३२ रा.गाढेश्वर) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फुट एक इंच, केस काळे, नाक सरळ, चेहरा उभट, डोळे काळे असून ती अंगाने सडपातळ, डाव्या हातावर सी अनिता असे गोंदलेले तसेच अंगात चॉकलेटी साडी घातलेली आहे. तिला मराठी भाषा अवगत असून सोबत मोबाईल फोन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्याने त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा हवालदार राजेंद्र केणी (८८५०४४१३९४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे रेस्क्यू टीमला मोठा आधार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात येथील रेस्क्यू टीमला दिलेल्या साहित्याचा आता सह्याद्री मित्र आपत्कालीन सामाजिक संस्थेला मोठा फायदा होत आहे. याची प्रचिती एका दाम्पत्याला दरीतून बाहेर काढताना आली. अतिशय आधुनिक दर्जाचे साहित्य असल्यामुळे या संस्थेला त्रास कमी होत आहे याबाबत संस्थेने समाधान व्यक्त केले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाच लाखांचे आधुनिक पद्धतीचे साहित्य येथील सह्याद्री मित्र आपत्कालीन सामाजिक संस्था यांना भेट स्वरूपात दिले. तरुणांच्या कामगिरीचे किस्से ऐकल्यानंतर त्यांनी साहित्य यादी मागवून घेतली.

या साहित्यामध्ये १०.५ एमएम आणि ११ एमएम असे २०० मीटरचे दोन दोर, ओके ट्रीयाक्त कॅरेबिनर, स्क्रू लॉक कॅरेबिनर, वॉकीटॉकी, डोक्यावरील बॅटरी, स्ट्रेचर किट असून यांचा मोठा उपयोग या संस्थेला होत आहे.

**संस्थेच्या काही सदस्यांनी रेस्क्यूसाठी साहित्याची मागणी केली होती. ही बाब आम्ही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कानावर घातली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता संस्थेला कोणते साहित्य अपेक्षित आहे याची यादी मागवून ते साहित्य त्वरित खरेदी करून ते संस्थेच्या स्वाधीन केले. याचा योग्य उपयोग होताना आम्हाला दिसत आहे.**

**-प्रवीण सकपाळ, अध्यक्ष भाजप, माथेरान शहर**

**आमदार प्रशांत ठाकूर यांनी आम्हाला रेस्क्यू साहित्य भेट स्वरूपात दिले. याचा फार मोठा उपयोग आणि फायदा आम्हाला झाला आहे. दोर, बॅटरी, वॉकीटॉकी यामुळे रेस्क्यू करणे सोपे झाले आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांचे मनापासून धन्यवाद!**

**-वैभव नाईक, अध्यक्ष, स.मि.आ.सा.संस्था**

# पीक विम्यापोटी राज्य शासन भरणार ४७२५ कोटींचा हिस्सा

**मुंबई : प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२४ साठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै रोजी संपुष्टात आली असून ३१ जुलैअखेर राज्यातून एक कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ पीक विमा अर्ज पीक विमा पोर्टलवर दाखल झाले आहेत. याद्वारे लाखो शेतकऱ्यांनी पीक १ रुपया विमा हप्ता भरून पीक संरक्षित केले असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. या विम्यापोटी एकूण ४७२५ कोटींचा हिस्सा राज्य सरकार भरणार आहे.



प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पीक विमा पोर्टलच्या वतीने सुरुवातीला १५ जुलै ही अंतिम मुदत देण्यात आली होती, मात्र कृषी मंत्री मुंडे यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विनंती करून ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ करून घेतली होती. १५ जुलैनंतर अखेरपर्यंत २१ लाख ९० हजार अर्जांची त्यामुळे वाढ झाली आहे.

दरम्यान, राज्यात एकूण ९७ टक्के पेरणी पूर्ण झाली असून पीकविमा योजनेच्या माध्यमातून एकूण एक कोटी १० लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले आहे. एकूण विमा संरक्षित रक्कम ही ५३ हजार ८८६ कोटी इतकी आहे.

एकूण विमा हप्ता हा सुमारे ७९५९ कोटी इतका निश्चित असून, त्यापैकी शेतकरी हिस्सा एक रुपयाप्रमाणे एक कोटी ६५ लाख, राज्य हिस्सा एकूण ४७२५ कोटी, त्यामध्ये राज्य शासनाचा स्वतःचा हिस्सा ३२३२ कोटी व शेतकऱ्यांच्या वतीने राज्य शासनाने भरावयाचा हिस्सा १४९२ कोटी इतका निश्चित करण्यात आला असून केंद्र सरकारचा हिस्सा ३२३३ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे.

मागील वर्षीच्या खरीप हंगामामध्ये सुमारे एक कोटी ७१ लाख विमा अर्ज दाखल झाले होते तर संपूर्ण हंगामात वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्या पोटी आतापर्यंत ७२८० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ४२७१ कोटी पीक विम्याचे वाटप पूर्ण झाले असून आणखी ३००९ कोटी रुपयांचे वितरण सध्या सुरू असून अंतिम पीक कापणी अहवालाचे काम १०० टक्के पूर्ण झाल्यानंतर या रकमेत आणखी वाढ होणार असल्याचेही मंत्री मुंडे यांनी म्हटले आहे.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विविध योजनांचा आढावा

जल जीवन मिशनची कामे लवकरात पूर्ण करून नागरिकांना या योजनेचा फायदा झाला पाहिजे यासाठी अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून समस्यांवर तोडगा काढावा, अशा सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिल्या तसेच लाडकी बहीण योजनेच्या कामाचा आढावा घेत जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ झाला पाहिजे याकरिता आशा सेविकांनी चांगले काम करावे. आपले काम जर चांगल्या पद्धतीचे असेल तर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आपल्यामधील चांगले काम करणाऱ्या पहिल्या पाच आशा सेविकांना तीन हजार, तर १० आशा सेविकांना १५०० रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

## घोटाळेबाज विवेक पाटील यांना सशर्त जामीन

विवेक पाटील यांच्यावर ६७ बनावट खात्यांच्या माध्यमातून ५६० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. चार वेळा शेकापचे आमदार राहिलेल्या विवेक पाटील यांना ईडीने १५ जून २०२१ रोजी अटक केली होती.

दरम्यान, कर्नाळा नागरी सहकारी बँकेत घोटाळा झाल्यापासून ठेवीदार, खातेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समिती स्थापन करून लढा सुरू केला. लढ्याच्या पहिल्या दिवसापासून माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या मार्गदशनाखाली लढाई सुरू झाली. घोटाळ्याचे आरबीआयला पत्र त्याचा पाठपुरावा, रिझर्व्ह बँकेवर मोर्चा, बँकेवर मोर्चा, सीआयडी, पोलीस आयुक्त, सहकार, ईडी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्या वेळी अनेकांना बँकेत घोटाळा झाल्याचे मान्य नव्हते. विवेक पाटील यांनी तर छातीठोकपणे घोटाळा झालाच नाही, मी पैसे खाल्ले असेल तर स्वतःला जाळून घेईन, असे म्हटले होते. राज्यातील राज्यकर्त्यांच्या पाठिंब्यामुळे आपल्याला काहीच होणार नाही या भ्रमात असलेल्या विवेक पाटील यांच्यावर अखेर ईडीने कारवाई करून अटक केली. नंतर त्यांची २३४ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली.

रिझर्व्ह बँकेने कर्नाळा बँकेचा व्यवसाय परवाना 'बँकिंग बिझनेस इन इंडिया अंडर रेग्युरेशन २२ सेक्शन ५६, रेग्युरेशन ॲक्ट १९४९नुसार रद्द करीत असल्याची अधिसूचना जारी केली. केंद्र सरकारने कायद्यात केलेल्या नवीन दुरूस्तीमुळे कर्नाळा बँकेत पाच लाखांपर्यंतच्या ठेवी (रिझर्व्ह बँक ठेवी विमा संरक्षण व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनच्या नव्या दुरूस्तीनुसार) ठेवीदारांना परत मिळाल्या. पाच लाखांपेक्षा कमी रक्कमेचे ४९ हजार ४२३ ठेवीदार होते. त्यांचे २४० कोटी रुपये केंद्र सरकारच्या निर्णयांनुसार विमा संरक्षणाच्या माध्यमातून परत मिळाले.

न्यायालयीन कोठडीत असलेल्या विवेक पाटील यांनी उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. २५ जुलैपासून न्या. मनीष पितळे यांच्यासमोर सुनावणीला सुरुवात झाली. विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. राहुल ठाकूर आणि ईडीतर्फे ॲड. वेनुगावकर यांनी तीन दिवस युक्तीवाद केला. गुरुवारी सुप्रीम कोर्टाच्या नवीन आलेल्या निकालाचा संदर्भ देऊन न्यायमूर्तींनी त्यांचा जमीन मंजूर करताना त्यांना वैयक्तिक ५० हजार रुपयांचे हमीपत्र देण्यास सांगून प्रत्येक महिन्याच्या सोमवारी सकाळी १० ते १२च्या दरम्यान ईडीच्या कार्यालयात हजेरी लावण्याचे आदेशही दिले आहेत.

## श्रीवर्धन येथील स्मशानभूमी शेडची दुरवस्था

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीमधील शेडची गेल्या अनेक दिवसांपासून दुरवस्था झाली आहे. या शेडचे पत्रे पूर्णपणे तुटले आहेत, तर त्या ठिकाणी बसण्यासाठी असलेल्या बाकांवर शेवाळ वाढले आहे, परंतु नगर परिषद प्रशासन शेडच्या दुरूस्तीचे काम करण्याची टाळाटाळ केली जात आहे.

नवी पेठ, कसबा पेठ, वाणी आळी, गुरव आळी, साळीवाडा, गणेश आळी, नारायण पाखाडी, ओजाळे पाखाडी, केळसकर पाखाडी, दाबक पाखाडी, पेशवे आळी या परिसरातील नागरिक अंत्यविधी करण्यासाठी मठाच्या स्मशानभूमीमध्येच येतात. मागील दोन वर्षांपासून या स्मशानशेडची दूरवस्था झाली आहे. त्यामुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात छत्र्या घेऊन उभे राहावे लागते. नगर परिषदेने स्मशानभूमीतील शेडचे दुरूस्तीचे काम तातडीने करावे, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## अफवांवर विश्वास ठेवू नये -ना. आदिती तटकरे

**मुंबई** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेला राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या योजनेचा लाभ देण्यासाठी तांत्रिक पडताळणी सुरू करण्यात आली आहे. या तांत्रिक पडताळणीसाठी काही पात्र महिलेच्या बँक खात्यात एक रुपया जमा होईल. जमा होणारा हा एक रुपया लाभार्थ्यांचा सन्मान निधीचा लाभ नाही तर तांत्रिक पडताळणीचा एक भाग आहे. असे सांगून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, या योजनेद्वारे अर्ज सादर केलेल्या निवडक पात्र महिला अर्जदारांच्या खात्यात पैसे जमा होईपर्यंत या संपूर्ण प्रक्रियेची तांत्रिक पडताळणी करण्यात येत आहे. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर काही निवडक महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी एक रुपया जमा करण्यात येत आहे. ही पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू करण्यासाठी निश्चितपणे मदत होणार आहे. हा एक तांत्रिक प्रक्रियेचा भाग असून याबद्दल कुठलाही प्रक्रियेचा गैरसमज किंवा कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नका, असेही मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.

### दुखवटा

## विष्णू शिंदे



**खोपोली** : नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावचे ज्येष्ठ ग्रामस्थ विष्णू काशीराम शिंदे यांचे बुधवारी (दि.३१) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. महिंद्रा युजिन स्टील कारखान्यात त्यांनी नोकरी केली. अत्यंत मनमिळाव व शांत स्वभावाचे विष्णू शिंदे यांच्या निधनाने सर्व कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले व चार विवाहित कन्या, नातवंडे असा परिवार आहे. अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# बुधवार हा कोरडा दिवस पाळा; साथरोग, किटकजन्य आजार टाळा!

## पनवेल मनपा आयुक्तांचे नागरिकांना आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. याच पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी 'बुधवार' हा दिवस कोरडा दिवस पाळावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

पावसाचे पाणी सध्या सर्वत्र साठलेले आहे या पाण्यामध्ये डेंगू, मलेरियाच्या डासांची पैदास होण्याची शक्यता असते. म्हणूनच वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत किटकजन्य आजाराविषयी खबरदारी घेण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

पावसाळ्यांनंतर विविध किटकजन्य रोगाचे प्रमाण वाढत असते. अशा वेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षारसंजिवनी मिश्रणाचा वापर करावा.

घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी, मनीप्लँट, वॉटरकूलर, फ्रिजच्या मागील ट्रे, पाणी साठवणीचे ड्रम इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक दिवस 'बुधवारी' पुर्णपणे काढून कोरडे करून 'कोरडा दिवस' पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

**रूग्ण आढळल्यास संपर्क साधा**

**हिवताप, डेंगू, मेंदूज्वर, चिकनगुनिया, मलेरिया असे साथीचे रूग्ण आपल्या आसपास आढळल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रूग्णालयाशी संपर्क साधावा. रूग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रूग्ण महापालिकेला idsppanvelcorporation@gmail.com या ई-मेल आयडीवर कळवावे, असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**

# १२ किलोमीटर फरफटत नेणारा डंपरचालक पोलिसांच्या ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**


पनवेलजवळील जेडब्ल्यूआर कंपनीजवळील निलेश ढाबा परिसरात एक डंपर दुसऱ्या ट्रेलरच्या केबिनला घासल्याने डम्पर थांबविण्यास सांगितले असता तो न थांबविता ट्रेलरचालकास फरफटत १२ किलोमीटर नेले. तो पडल्यानंतर डम्परचालक डम्परसह पसार झाला. डम्परचालकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

प्रवीण येळे (वय २६) हे कळंबोली येथे असताना आरोपी डम्परचालक राकेश चौधरी (वय २६) याच्या ताब्यातील डंम्परने प्रवीण येळे यांच्या ट्रेलरच्या केबिनला घासल्याने प्रवीण येळे यांनी राकेश चौधरी यास थांबण्यास सांगितले असता तो थांबल्याने त्याचा पाठलाग करून वरील परिसरात आले असताना प्रवीण येळे यांनी राकेश चौधरी याला उतरण्यासाठी तो डंम्परच्या बोनेटवर चढला असताना राकेश चौधरी याने डम्पर न थांबविता जेएनपीटीच्या विरुद्ध दिशेने घेऊन जाऊ लागला.

या वेळी प्रवीण येळे हे डम्परच्या बोनेटवर धोकादायक परिस्थितीत लटकले होते. त्या स्थितीत त्याला १२ किलोमीटर घेऊन गेले. पुढे कुंडेवहाळ परिसरामध्ये असलेल्या खदानीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावरून प्रवीण येळे हे चालत्या बोनेटवरून खाली पडले व त्यात ते गंभीर जखमी झाले. अशा परिस्थितीतसुद्धा राकेश चौधरी त्यांना तसेच तेथे टाकून तो डम्परसह पसार झाला होता.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक उद्धव साळुंखे यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीला नवी मुंबई परिसरातून ताब्यात घेतले आहे.

# बिगारी कामगार हरविल्याची तक्रार



**पनवेल :** शहरातील ब्रिजखाली बिगारी काम करण्यासाठी आलेला व्यक्ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

हरिशंकर बुद्धु कजले (वय ४५, नांदगाव भिंगारी) असे या व्यक्तीचे नाव असून त्याचा रंग काळा, उंची पाच फुट, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट असून अंगात लाल शर्ट व सफेद फुल पॅन्ट, पायात स्लिपर घातलेली आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा हवालदार विलास कारंडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपच्या शहर व तालुका मध्यवर्ती कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, उमेश इनामदार, तुकाराम पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यानी अभिवादन केले.**



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात गुरुवारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते.**

# उरण हत्याकांडप्रकरणी आरोपीला कठोर शिक्षा करा

## कामोठे येथे भाजप पदाधिकाऱ्यांची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात घडलेल्या उरण हत्याकांडप्रकरणी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी यासाठी गुरुवारी (दि. १) भाजप महिला मोर्चा कामोठे मंडलच्या पदाधिकाऱ्यांनी मोर्चा काढून आंदोलन केले. या वेळी सर्व मान्यवर नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, महिला मोर्चा आणि सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाने अशा नराधमांवर जरब बसावा यासाठी हा खटला फास्ट ट्रॅक मध्येच चालवून आरोपीला जास्तीत जास्त कठोर फाशीची शिक्षा द्यावी यासाठी समाजमन आणि समाजाच्या भावना अतिशय तीव्र आहेत. याबाबत कामोठे पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित कांबळे यांना निवेदन दिले. या वेळी माजी नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम मात्रे, हेमलता गोवारी, भाजप सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, भाजपा जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, सोशल मीडिया संयोजक सुशील कुमार शर्मा, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, हरजिंदर कौर, शिक्षक सेल अध्यक्ष मनोहर शिंगाडे, मोहन जोशी, सुरेखा लांडे, वर्षा शेलार, फातिमा आलम, ललिता दपलपुडी, श्रुतिका देवरुखकर, विकास टेकवडे, विनोद खेडकर, स्वाती केंद्रे, आयुष केंद्रे, सामाजिक कार्यकर्ते भाऊ भगत, रवी गोवारी आदी उपस्थित होते.

# कळंबोलीतील स्टील मार्केटमध्ये छताचा भाग कोसळला



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीच्या कार्यालयामध्ये छताचा भाग कोसळल्याची घटना घडली. या वेळी कार्यालय बंद असल्याने कोणीही या घटनेत जखमी झाले नाही.

५४ कोटी रुपयांचा अपहार झालेल्या कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजार समितीचा कारभार सध्या जोरदार चर्चेत आहे. आशियाखंडातील सर्वांत मोठी लोखंड व पोलादाची बाजारपेठ कळंबोली येथे असल्याने या समितीच्या कार्यालयाचे महत्त्व अधिक आहे, मात्र या समितीमध्ये झालेल्या संशयास्पद कारभारामुळे समिती वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. बाजार समितीचे कार्यालय सध्या ज्या इमारतीमध्ये आहे ती इमारत जिर्ण अवस्थेमध्ये आहे. बाजार समितीचे कार्यालय असलेल्या छताला अंतर्गत केलेल्या सजावटीचा भाग कोसळला. याच इमारतीमध्ये पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय आहे. सध्या प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयालासुद्धा लोखंडी टेकू लावण्यात आले आहेत. लोखंड पोलाद बाजार समितीने २०१७ साली कार्यालयाचे सजावटीचे काम केले होते. झालेल्या पडझडीनंतर या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय बाजार समितीने घेतल्याची माहिती बाजार समितीचे कार्यकारी अधिकारी अमिष श्रीवास्तव यांनी दिली. जीर्ण इमारत कोसळण्यापूर्वी सरकारी कार्यालये सूरक्षित ठिकाणी हलविण्याची मागणी दोन्ही सरकारी कार्यालयाकडून होत आहे.

या दोन्ही सरकारी कार्यालयांचे प्रमुख जागेच्या शोधात आहेत, मात्र सरकारी भाडेदरात प्रशस्त जागा सापडत नसल्याने जीव मुठीत घेऊन सरकारी कर्मचारी व अधिकारी धोकादायक इमारतीमधून काम करत आहेत.

# गव्हाण विद्यालयात अण्णा भाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विश्वविख्यात साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०४ जयंती व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त या दोन्ही नेत्यांना रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर तथा जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांच्या हस्ते या दोन्ही महान नेत्यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. हा कार्यक्रम इयत्ता दहावी क च्या वतीने साजरा करण्यात आला. या वेळी वर्गशिक्षक एस. के. भोईर यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले.

या वेळी विद्यालयाचे उपप्राचार्य पी.बी. मंडले तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर. एस. भोईर, ज्येष्ठ इंग्रजी विषय शिक्षक डी.के. म्हात्रे आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या वेळी म्हात्रे सर यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आले. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी या थोर महापुरुषांना पूजन करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले, विद्यार्थ्यांची भाषणे. या वेळी आपल्या कणखर आणि बाणेदार शैलीत स्मित कुंदन मोकल (इयत्ता सातवी ब) याने टिळकांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. प्रतीक पवार, श्रीधर सुतार (इयत्ता पाचवी ब) तसेच कांचन मेलीणमनी (इयत्ता दहावी) अशा साधारण दहा विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून या थोर महापुरुषांना आदरांजली वाहिली.

या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी केले, तर आभार इयत्ता दहावी क चे वर्गशिक्षक एस. के. भोईर यांनी मानले.



# कमळ महिला पतपेढीच्या उपाध्यक्षपदी पूर्वा खेडेकर बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विभावरी विद्याधर कुळकर्णी यांच्या निधनानंतर कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (म.) पनवेल या संस्थेचे उपाध्यक्ष पद रिक्त होते. त्याचे जागी पूर्वा प्रशांत खेडेकर या संचालिकेची निवड बुधवारी (दि. ३१) मा. सहाय्यक निबंधक तथा निवडणूक अधिकारी भारती काटुळे यांचे अध्यक्षतेखाली झाली आणि त्यांची संस्थेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.



पूर्वा खेडेकर या संस्थेत गेले २० वर्षे संचालिका म्हणून काम करतात. त्या व्यवसायाने शिक्षिका आहेत तसेच संस्थेच्या सर्व कार्यक्रमात उत्तम सुत्र संचालन करतात.

या वेळी संस्थेच्या अध्यक्षा मालती आंग्रे, संस्थेचे संस्थापक तथा तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर, संस्थेच्या सर्व संचालिका तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



## संपादकीय

# घसरलेल्या जिभा

सुसंस्कृत राजकारणाचे उदाहरण घालून देणारे राज्य अशी महाराष्ट्राची एकेकाळी ओळख होती. 'एकेकाळी' असे दुर्दैवाने म्हणावे लागते कारण ते दिवस आता बहुदा कायमचे मागे पडले आहेत. दिवसेंदिवस राज्यातील राजकारणाची पातळी तळ गाठू लागली आहे. ही घसरण कधी आणि कुठे थांबणार याचीच चिंता सुजाण नागरिकांना लागून राहिली असेल.

**सुमारे पाच वर्षांपूर्वी भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील अखंड शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी साटेलोटे केले. केवळ सत्तेसाठी सारी नैतिकता गुंडाळून ठेवून अडीच वर्षे महाराष्ट्रातील सुरळीत चाललेल्या कारभाराचा सत्यानाश केला. इथूनच राज्यातील राजकारणाची पातळी घसरत गेली ती गेलीच. ठाकरे गटाच्या सर्वोच्च नेतृत्वासह अनेक नेत्या-प्रवक्त्यांनी मधल्या काळात जी मुक्ताफळे उधळली, त्याने महाराष्ट्राची प्रतिमा देशपातळीवर खालावली आहे. ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत रोज सकाळी शिव्यांची लाखोली वाहतात. असंख्य नागरिकांना राजकीय नेत्यांची ही शिवराळ भाषा नकोशी झाली असेल. इतकी उद्वेगजनक शिवराळ भाषा महाराष्ट्राने यापूर्वी कधीच ऐकली नसेल. महाराष्ट्राचा मंगल कलश १९६० साली आणण्यात आला. त्याआधी आचार्य प्र. के. अत्रे यांचा तोफखाना धडाडत होता, त्यांच्या भडिमारापुढे भलेभले नांगी टाकत. प्रबोधनकार ठाकरे यांची भाषा देखील तिखट आणि थेट असे. खुद्द हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शब्दांचा मार देखील त्यांच्या विरोधकांनी खाल्ला आहे, परंतु असे असले तरी आजच्या सारखी गलिच्छ भाषा यांच्यापैकी कुणीही कधीही वापरली नाही. संजय राऊत कसे बोलतात हे तर साऱ्यांनाच माहीत झाले आहे, परंतु आता त्यांच्या सर्वोच्च नेत्यांनीदेखील ताळतंत्र सोडले आहे हे दुर्दैवी आहे. स्वत:ला कुटुंबवत्सल, सुसंस्कृत नेता म्हणवून घेणारे हे सर्वोच्च नेते हतबलतेपायी किती घसरले आहेत याचेच प्रत्यंतर परवा आले. शाखाप्रमुखांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी एकेरीवर येत भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर अद्वातद्वा टीका केली. इतकेच नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घाम फोडण्याची भाषा देखील त्यांनी केली. आता ही मुक्ताफळे विनोद म्हणून सोडून द्यायची की त्यामुळे उद्विग्न व्हायचे हे ज्याचे त्याने ठरवावे, परंतु शिवराळ भाषा आणि वैयक्तिक अपमान म्हणजेच विरोध करणे ही कुठली राजकीय संस्कृती आहे? विरोधीपक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या मुखातूनही सध्या तीच मस्तवाल भाषा सतत ठिबकत असते. दुर्दैवाने तोच संस्कार ठाकरे गटाने उचलला आहे. वाईट संगतीत माणूस बिघडतो याचे हे उत्तम उदाहरण ठरावे. उद्धव ठाकरे यांच्या एकेरी भाषेवर भाजपच्या कित्येक नेत्यांनी टीकेची झोड उठवली हे बरेच झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही उद्धव ठाकरे यांच्या विधानावर भाष्य करत त्यांना प्रत्युत्तर दिले आहे. आम्ही ज्या पद्धतीने कल्याणकारी योजना आणतो आहोत, त्या बघून उद्धव ठाकरे यांना पोटदुखी झाली आहे. ते बिथरले आहेत, परंतु आव्हानाची भाषा करण्यासाठी मनगटात जोर असावा लागतो असे शिंदे यांनी यासंदर्भात म्हटले आहे. खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी मात्र त्यावर कोणतेही भाष्य केलेले नाही. याचे कारणदेखील उघडच आहे. शहाण्याला शब्दांचा मार पुरतो. अन्यथा उगा मुक्ताफळे उधळणाऱ्यांना उत्तरे देण्यात वेळ वाया का घालवावा?**

# खड्डे, जुनाट झाडे ठरताहेत अपघाताला कारणीभूत





अलिबाग हे पर्यटनस्थळ आहे. त्याचबरोबर रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयाचे ठिकाण आहे. लाखो लोक पर्यटनासाठी व आपल्या कामसाठी विविध शहारातून तसेच जिल्ह्याच्या इतर भागातून दररोज अलिबागला येता. अलिबागला येण्यासाठी पेण-अलिबाग, रोहा-अलिबाग, रेवस-अलिबाग, मुरूड-अलिबाग हे महत्त्वाचे मार्ग आहेत. या सर्व रस्त्यांवर सध्या खड्डे पडले आहेत. रस्त्यात पडलेले खड्डे त्याचबारोबर सररस्त्याच्या दूतर्फा असलेली जुनाट झाडे अपघातास कारणीभूत ठरत आहेत. शिवाय रस्त्यालगत असलेली दुकाने, घरांचे अतिक्रमणेदेखील अपघातांना निमंत्रण देत आहेत.

काही दिवसांपूर्वी अलिबागजवळ चेंढरे येथील जुनाट वटवृक्ष जमीनदोस्त झाला. हे झाड एका धावत्या ट्रकवर कोसळले. केवळ सुदैव म्हसणून यात कुठलीही जीवितहानी झाली नाही, मात्र ट्रकचे मोठे नुकसान झाले. या मार्गावर सतत चारचाकी, दुचाकी वाहनांची वर्दळ सुरू असते. मुंबईला जलमार्गे जाणारे प्रवासी याच मार्गाने जात असतात. रो-रोने प्रवास करणारया वाहनांची वाहने ये-जा करीत असतात. त्यामुळे ही धोकादायक जुनी झाडे जीवघेणी ठरू शकतात.

अलिबागपासून अगदी मांडवा दस्तुरीपर्यंत या मार्गावर रस्याच्या दुतर्फा भरपूर झाडे आहे. ही झाडे ५० ते ६० वर्षे जुनी असून ती आकारराने खूपच वाढली आहेत. बेसुमार वाढलेल्या फांद्यांचा भार झाडे सहन करू शकत नाही अशा स्थितीत आहेत. पेण-अलिबाग मार्गावरदेखील अशीच जुनाट झाडे आहेत. काही वर्षांपूर्वी राऊतवाडी येथे एक झाड उन्मुळून मोटरसायकलवर पडले. या मोटरसायकलवरून प्रवास करणाऱ्या वडील व मुलीचा जागीच मृत्यू झाला होता.

रस्याचे रूंदीकरण करताना या झाडांचा विचारच करण्यात आला नाही. त्यायमुळे ही झाडे अगदी रस्याला खेटून आहेत. पादचार्यांना ये-जा करण्यासाठी साईड पटटीच उरलेली नाही. त्यामुळे पादचार्यांना डांबरी रस्यावरूनच ये-जा करावी लागत आहे. त्यामुळे अपघात होतात.

रस्त्याने प्रवास करताना प्रवाशांना सावली मिळावी या हेतून रस्त्याच्या दुतर्फा सावली देणारी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

झाडे लावली जातात, परंतु ही झाले मोठी झाल्यानंतर त्याच्या फांद्या वाढतात. या फांद्या आपघातस कारणीभूत ठरतात. या फांद्या पावसाळ्यापूर्वी छाटाव्यात अशी मागणी नागरिक करत असतात, परंतु त्याकडे गांभिर्याने पाहिजे जात नाही. अपघात झाला की यंत्रणा कामाला लागते. अपघात होण्याची वाट पाहण्यापेक्षा ते होऊनयेत यासाठी खबरदारी घ्यायाल हवी. रस्त्यांच्या बाजूला असलेली जीवघेणी ठरू शकतील अशा झाडांची छाटणी पावसाळ्यापूर्वी केली पाहिजे. तसे केल्या झाडाचा भार कमी झाल्यामुळे उन्मळून पडण्याचा धोका कमी होईल. आवश्यकता असेल तेथे जुनी झाडे मुळापासून उपटून तेथे नवीन झाडे लावायला हवीत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला बेकायदेशीर दुकाने बांधाण्यात आलर आहेत. घरांचे अतिक्रमण झाली आहेत. ही अतिक्रमण अपघातांना निमंत्रण देत आहेत.

अलिबाग तालुक्यातील मुख्य रस्त्यांवर जुनाट झाडे, अतिक्रमण आहेत त्याचबरोबर सर्व रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. जे मोठ खड्डे होत ते पेवरबॉक्सने बुजविण्यात आले आहेत, परंतु छोट खड्डे मात्र बुजविण्यात आलेले नाहीत. हे छोटे खड्डेदेखील अपघातास कारणा ठरत आहेत. पळी येथे याच खड्डयांमुळे अपघात झाला होता. हे खड्डे मोटरसायकलस्वारांचा जीव घेऊ शकतात.

तालुक्यातील मुख्य रस्त्यांवर जसे खड्डे पडले आहेत तसेचे गावंमधून मुख्यररस्त्यांना जोडणारे रस्तेदेखील खड्ड्यात गेले आहेत. या खड्ड्यांमधून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अलिबागपासून १५ किलोमीटर अंतरावर वावे नाका आहे. या नाक्यापासून आतील बाजूस दोन किलोमीटर अंतरावर बेलोशी गाव आहे. वावे नाका ते बेलोशी या रस्त्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. रुंदीकरणाबरोबरच खड्डे बुजवणे, कारपेट टाकणे, डांबरीकरण करणे अशा अनेक प्रकारची कामे होती, मात्र हे काम अपूर्ण राहिल्याचे चित्र आजही दिसून येत आहे. या रस्त्यासाठी लाखो रुपये खर्च करूनही पावसाळ्यात हा रस्ता खराब होत आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

वाहनांबरोबरच पादचाऱ्यांनादेखील या खड्ड्यातून प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच, खड्डयांमुळे रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे. दगड, खडी रस्त्यावर आली आहे. या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना अपघाताची भीती निर्माण झाली आहे, असे अनेक रस्त आहेत जे खड्ड्यात गेले आहेत. त्यांची दुरूस्ती केली गेली पाहिजे.

## बदलते तंत्रज्ञान

# 'या' फोनची स्क्रीन मोफत बदलली जाणार

OnePlusने आपल्या वापरकर्त्यांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. कंपनीने निवडक स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी



एक खास ऑफर जाहीर केली आहे. या ऑफर अंतर्गत, कंपनी ग्रीन लाईन समस्या सोडवण्यासाठी मोफत स्क्रीन रिप्लेसमेंट देत आहे. ग्रीन लाइनची समस्या भारतातील OnePlus फोनवर अनेकदा दिसून आली आहे. यामुळे ग्राहकांनी तक्रारीही केल्या होत्या, या तक्रारी सोडण्यासाठी कंपनीने हे पाऊल उचलले आहे.

ही समस्या OnePlus 8T, OnePlus 8 Pro, OnePlus 9 आणि OnePlus 9R स्मार्टफोनमध्ये दिसली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी कंपनी या फोनच्या डिस्प्लेवर आजीवन वॉरंटी देत आहे. आता कंपनीने एक नवीन ऑफर आणली आहे. ही नवीन ऑफर OnePlus च्या मोफत स्क्रीन अपग्रेड OnePlus Red Cable Club Royalty Program वर दिसली आहे.

या ऑफर अंतर्गत, OnePlus 8T, OnePlus 8 Pro, OnePlus 9 आणि OnePlus 9R स्मार्टफोन वापरकर्ते मोफत स्क्रीन रिप्लेसमेंटचा दावा करू शकतात. यासोबतच त्यांना देखभाल सेवाही मिळणार आहे.

**अटी काय आहेत?**

यासाठी कंपनीने अटही घातली आहे. विनामूल्य स्क्रीन बदलण्यासाठी तुमचा फोन डॅमेज नसला पाहिजे. तसेच, ते कोणत्याही थर्ड पार्टी सर्व्हिस सेंटरमध्ये उघडू नये. तुमचा फोन या अटी पूर्ण करत असल्यास, तुम्ही मोफत स्क्रीन बदलण्यासाठी संपर्क करू शकता.

अहवालानुसार, कंपनी या प्रोग्राम अंतर्गत ॲडव्हान्स डिस्प्ले पॅनेल ऑफर करत आहे. नवीन स्क्रीन चांगली कामगिरी, मजबूत असेल. हे डिस्प्ले उच्च आर्द्रता आणि उच्च तापमान असलेल्या ठिकाणी काम करण्यासाठी डिझाइन केले आहेत.

ही ऑफर फक्त डिस्प्लेवर येणाऱ्या ग्रीन लाईनची समस्यावर सोडवण्यासाठी सुरू केली आहे. जुन्या AMOLED डिस्प्लेवर ही समस्या दिसून येते. OnePlus फोनमध्ये दिसून येते. ही योजना आधीच तुटलेल्या फोनवर लागू होणार नाही. जर तुमचा फोन आधीच खराब झाला असेल किंवा तुम्ही थर्ड पार्टी सर्व्हिस सेंटरमध्ये तो दुरुस्त करून घेतला असेल, तर तुम्हाला या योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच, ही योजना फक्त वरती दिलेल्या फोनसाठी आहे.

# कवी, कादंबरीकार पुरुषोत्तम रेगे



**निमित्त**

श्रेष्ठ मराठी कवी, तसेच कादंबरीकार नाटककार, समीक्षक व संपादक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मिठबाब येथे झाला. शिक्षण मुंबई व लंडन येथे बी.ए. व बी.एस्सी. पर्यंत. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून त्यांनी बी.एस्सी. ही पदवी मिळविली होती. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले.

'सुहृद चंपा' आणि 'रूप कथ्थक' ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी तर 'रूपकथ्थक' हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु.शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. उदा., छांदसी नावाचा त्यांचा १९६२ साली प्रसिद्ध झालेला समीक्षात्मक लेखांचा संग्रह.

साधना आणि इतर कविता ह्या त्यांच्या काव्यसंग्रहानंतर फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) आणि प्रियाळ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. १९४५ पर्यंतची त्यांची कविता मुक्तच्छंदात लिहिलेली असली, तरी नवकाव्य म्हणता येईल अशीही ती नव्हती. ते वळण १९४५ नंतरचे पण तरीही ते मर्ढेकरी नवकाव्याच्या वळणाचे नव्हते. त्याचे स्वरूप खास रेगेय म्हणता येईल असे होते.

रूपकथ्थक (१९५६) व मनवा (१९६८) हे त्यांचे दोन कथासंग्रह असून त्यांच्या कथांतूनही त्यांच्या कविमनाचे नाजूक पदर व त्यांचे अल्पाक्षरमणीयत्व जाणवते. यांतील काही कथा गुजराती, फ्रेंच, जर्मन, स्वीडिश, स्पॅनिश ,रशियन आणि चिनी या भाषांत भाषांतरित झाल्या आहेत.

सावित्री (१९६२), अवलोकिता (१९६४), रेणू (१९७३) आणि मातृका (१९७८) या रेगे यांच्या चारी कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. त्यातील भावविश्व गूढ, तत्वस्पर्शी, सखोल व समृद्ध आहे. सावित्री ही पत्ररूप कादंबरी असून सावित्री आणि अवलोकिता या कादंबऱ्या परस्परांना पूरक ठरतील अशा स्वरूपाच्या आहेत. रेणू आणि मातृका त्याहून वेगळ्या आहेत. त्यामधूनही त्यांच्या कविमनाचे स्त्रीत्वाविषयीचे आकर्षण प्रकट झाले आहे.

रेगे यांना १९६५ मध्ये रशियाचा प्रवास करण्याची संधी लाभली. मॉस्को येथे लघुकथा या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांनी भाग घेतला. १९६५ मध्ये केरळ येथे झालेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. १९६९ सालच्या वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



मुरुड : मासेमारी हंगाम नव्याने सुरू होताना समुद्रकिनारी शाकारलेल्या होड्या गुरुवारी पुन्हा समुद्रात मार्गस्थ झाल्या.

## आरोग्य प्रहर

# रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात करा बदल

जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनचे उत्पादन कमी होते, तेव्हा लाल रक्तपेशी तयार होत नाहीत. त्यामुळे निमिया होऊ शकतो. म्हणजे सामान्य भाषेत रक्ताची कमतरता. यामुळे त्वचा पिवळी पडते, चेहरा व पाय या सारख्या अवयवांना सूज येते, चक्कर येते. अशक्तपणा जाणवतो, श्वास घेण्यात अडचण येणे, हृदयाचे ठोके अनियमित होतात.



अशी वेगवेगळी लक्षणे दिसू लागतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि स्वतःची तपासणी करून घ्यावी. सोबत काही पदार्थांचा आहारात समावेश करू शकता.

शरीरातील अशक्तपणाचे मुख्य कारण म्हणजे शरीरात लोहाची कमतरता. यामागे अनेक कारणे असू शकतात, जसे की मासिक पाळीत जास्त रक्तस्राव होणे, खाण्याच्या योग्य सवयींचा अभाव. त्यामुळे कोणते पदार्थ खाल्ल्याने शरीरातील हिमोग्लोबिनचे उत्पादन वाढण्यास मदत होते हे जाणून घेऊया.

**ही फळे खाणे फायदेशीर**

ज्यांना निमियाचा त्रास आहे त्यांनी रोजच्या दिनचर्येत सफरचंद आणि डाळिंबाचे सेवन करावे. ही दोन्ही फळे निमियाच्या समस्येवर खूप फायदेशीर मानली जातात आणि इतर पोषक तत्वांची कमतरता देखील पूर्ण करतात.

**मनुका खा**

दररोज मनुका खाणेदेखील रक्ताची कमतरता दूर करण्यासाठी फायदेशीर मानले जाते. मनुका लोहाचा चांगला स्रोत आहे. मनुके रात्रभर भिजत ठेवा आणि रोज सकाळी सेवन करा. याशिवाय द्राक्षे खाणेही फायदेशीर आहे.

**हिरव्या पालेभाज्या**

पालक आणि इतर हिरव्या पालेभाज्या देखील लोहाचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत. त्यामुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत होते. त्यामुळे रोजच्या दिनचर्येत हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करावे.

**दुग्धजन्य पदार्थांचे सेवन**

दूध आणि त्याची उत्पादने जसे की चीज, दही इ. सर्व दुग्धजन्य पदार्थ हे पौष्टिकतेचे उत्तम स्रोत आहेत जे तुमच्या शरीराला केवळ ताकद देत नाहीत तर हिमोग्लोबिनच्या उत्पादनास प्रोत्साहन देतात. अशक्तपणाची समस्या असल्यास दुग्धजन्य पदार्थ रोज घ्यावेत.

# मोरबे प्रकल्पग्रस्त आदिवासी सुविधांच्या प्रतीक्षेत

## आरकसवाडी, पिरकटवाडी आणि उंबरणेवाडी रस्ता, पुलापासून वंचित

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव झाला, तरी खालापूर तालुक्यातील मोरबे धरणामुळे प्रकल्पग्रस्त झालेला आदिवासी समाज आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे.

येथील आरकसवाडी, पिरकटवाडी आणि उंबरणेवाडीतील ग्रामस्थ आजही दळणवळणासाठी रस्ता व नदीवरील पुलापासून वंचित आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

खालापूर तालुक्यात असलेले मोरबे धरण हे नवी मुंबई महानगरपालिका आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर आणि कामोठे विभागाला पाणीपुरवठा करीत असून हे धरण नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. हे धरण बांधताना आठ महसुली गावे आणि सात आदिवासीवाड्यांच्या जागा संपादीत केल्या आहेत. त्यातील आरकसवाडी,





पिरकटवाडी आणि उंबरणेवाडी यातील काही घरे पुनर्वसन ठिकाणी आली तर काहींनी अद्याप जागा सोडल्या नाहीत.

आरकसवाडी ही वाडी माथेरानच्या पायथ्याशी आहे. मोरबे धरणाच्या वरील भागात व माथेरान डोंगराच्या कुशीतून धावरी नदीचा उगम होतो. गेले काही दिवस सतत पावसाचे थैमान सुरू आहे. त्यामुळे नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आहे. नदी ओलांडल्याशिवाय आरकसवाडीत जाऊ शकत नाही. आरकसवाडी येथे आजारपणामुळे कमळी बाळू चौधरी या मृत झाल्या.

मयताच्या अंत्यसंस्कारासाठी आलेले नातेवाईकांना आणण्यासाठी त्या गावातील लोकांनी नदीच्या दोन्ही काठावर असलेल्या झाडांना दोर बांधून पूल तयार केला, पण पिरकटवाडी येथे दफनभूमी असल्याने आरकसवाडीतून येऊन धावरी नदीच्या पात्रातून मयताची तिरडी घेऊन दुःखी लोक पीरकटवाडीत आले.

काहींनी हे दृश्य आपल्या मोबाईलमध्ये कैद केले आहे. आपला जीव मुठीत घेऊन खांद्यावर मयताची तिरडी घेऊन दफन केले. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपन्न झाला तरी आदिवासी विभागात आजही दुर्लक्ष होत असल्याची टीका आदिवासी नेते अंकुश वाघ यांनी केली.

या तिन्ही वाड्यांचे अधिकृत पुनर्वसन झाले असले तरी त्यांना तेथे रोजगार उपलब्ध नाही. याच ठिकाणी ७० हेक्टर दळी प्लॉट शेती करून उपजीविकेसाठी पुनर्वसन पूर्वीच देण्यात आला असल्याने तिथे रहाणारे नाचणी, वरी यांच्या पिकाबरोबर भाजीपाला लागवड करतात.

या आदिवासीवाड्यांपासून जवळच माथेरान असल्याने डोंगर चढून गावठी कोंबड्या, शेळी, अंडी, दूध यांचा व्यवसाय कायमस्वरुपी मिळत असल्याने हे लोक जागा सोडण्यास तयार नाहीत. सामुदायिक वनहक्क दावा दाखल करून रस्ता आणि पुलाची मागणी करण्यात येणार असून नवी मुंबई महानगरपालिका यांनीही या सुविधा देण्याबाबत आश्वासित केल्याचे अंकुश वाघ यांनी सांगितले.

याबाबत खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनीही आम्हाला सहकार्य केल्याचे अंकुश वाघ यांनी सांगितले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग :** बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. बुधवारी (दि.३१) वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २३१ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ४५ हजार रुपये दंड आकारला आहे.

## महागडी कार स्वस्तात देतो सांगून ५० लाखांची फसवणूक; आरोपीला अटक

**नेरळ : प्रतिनिधी**

महागडी कार स्वस्तात देतो म्हणून सांगून नेरळमध्ये एका व्यावसायिक तरुणाला ५० लाखांला नवी मुंबई येथील व्यक्तीने गंडवले आहे. सागर सुनील हजारे असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव असून नवी मुंबईतील अमोल विठोबा तोडकरी याने फसविल्याचे सांगण्यात आले. याबाबत नेरळ पोलिसांकडे तक्रार दाखल होताच अमोल तोडकरी यास नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नेरळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेरळ पूर्व येथील सागर हजारे यांची घणसोली येथील अमोल तोडकरीशी ऑक्टोबर २०२३मध्ये ओळख झाली होती. तोडकरी यांनी प्रथम आपण उरण जेएनपीटी बंदर येथे कस्टम अधिकारी असल्याची खोटी ओळख दिली होती, तर आपण कस्टममध्ये ओळख करून घरगुती वस्तू, टीव्ही, फ्रीज इलेट्रॉनिक वस्तू, तसेच नवीन कार, क्रेन, मोबाईल अशा महागड्या वस्तू आपण स्वस्तात काढून देतो, असे सांगितले होते. सागर यांना सुरुवातीला तोडकरी यांनी १४ आयफोन प्रो मॅक्स कंपनीचा एक मोबाईल आणि कपडे धुण्याची मशीन स्वस्तात देऊन विश्वास संपादन केला होता. त्यानंतर तोडकरी यांनी नवीन कार, क्रेन, स्कुटी तसेच इतर साहित्य देतो म्हणून फिर्यादी सागर हजारे यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने ४८ लाख ३४ हजार ५०० रुपये हे वेगवेगळ्या टप्प्यात घेतले, मात्र या दिल्याच नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सागर हजारे यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

नेरळ पोलिसांनी तत्काळ आरोपी अमोल विठोबा तोडकरी याला घणसोली, नवी मुंबई येथून ताब्यात घेतले आहे. आरोपीने अशा अजूनही फसवणूक केली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## रोहा उपजिल्हा रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ नसल्याने महिलांची परवड

**धाटाव :** रोहा उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सुविधांची वानवा आहे. रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ नसल्याने महिलांची परवड सुरू असल्याचे दिसून येत आहे. सोनोग्राफी मशीन आहे पण टेक्निशियन नसल्याने तेही बंद आहे. महिलांना आरोग्याविषयक समस्या, गरोदरपणात त्यांना, बाळाला उपचाराची गरज असते. अशा वेळी शासकीय




दवाखान्यात सुविधा नसल्याने गरीब, आदिवासी महिलांना खासगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे याबाबत रुग्णालय प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरीत आहे.


### महाराष्ट्र शासन
**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.**

एम.टी.एन.एल. वागळे इस्टेट यांचे कार्यालयीनआवार, रोड नं. १६, टोयोटो शोरूम समोर, ठाणे. (प.) ४०० ६०४. Email ID: atc.thane-mh@gov.in
दुरध्वनी क्र. ०२२-२५८२३५२८, २५८००६३७, २५८३३८२२.

**ई-निविदा सूचना क्रं.०९/२०२४**

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे अंतर्गत येत असलेल्या पेण प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील १४ शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात भाजीपाला पुरवठा करणेबाबत

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे हे त्यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भाजीपाला पुरवठा करणेसाठी नामवंत आणि अनुभवी उत्पादक / वितरक यांच्याकडून खुल्या स्पर्धात्मक ई-निविदा मागवित आहे.

निविदा कागदपत्रांबाबत व ई-निविदेत भाग घेऊ इच्छुक निविदाकारांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

निविदा फक्त ऑनलाईन स्वीकारल्या जातील. ऑनलाईन निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक ०२.०८.२०२४ ते १६.०८.२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत राहील.

सही/-
**(दीपक कुमार मीना, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे.**



### WANTED

One Junior Lady Advocate having LL.B Degree and holding provisional Sanad or permanent Sanad from Bar Council of Maharashtra and Goa, preferably from the Panvel City or surrounding area is required for my office. Interested candidates may contact between 6:00 pm to 8:00 pm on the following Address or Contact Number, fresher will be preferred. Cell Number for contact 9029848965.

sd/-
**Adv. J.B.Apte**

**Office Address -** Flat No. 1, Indu-vina, Back To V.K.High School, Line Ali, Old Panvel, Panvel, Raigad Contact No. 9029848965


### PUBLIC NOTICE

**NOTICE** is hereby given public at large that my client **Karnataka Lingayat Education Society Belagavi (Karnataka)** is intending to purchase the property mentioned in the schedule hereinunder from its owner/lease holder **MR. NADEEM LATIF DALVI** by executing registered Deed of Assignment.

Any person/persons having any claim against or to the said property by way of Sale, Mortgage, Development, charge, gift, lease, easement, use, trust, possession, inheritance, lien or otherwise however is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein below, within a period of 7 days from the date of publication hereof, otherwise the transaction of sale/purchase/assignment will be completed without reference to such claims, and the same, if any, will be considered as waived.

**SCHEDULE**
**[Description of property]**

**Plot/Row House No. A-30, Sector No. 14, Kalamboli, Tal. Panvel, Dist. Raigad, admeasuring 100.06 Sq.mtrs.**

Date: 01/08/2024.

sd/-
**PRASHANT A. BHUJBAL**
**Adovcate**
2, Ashadeep Apartment, Near Panvel Town Police Station, Beside Anil Xerox, Panvel, Tal. Panvel, Dist. Raigad

### महाराष्ट्र शासन
**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.**

एम.टी.एन.एल. वागळे इस्टेट यांचे कार्यालयीनआवार, रोड नं. १६, टोयोटो शोरूम समोर, ठाणे. (प.) ४०० ६०४. Email ID: atc.thane-mh@gov.in
दुरध्वनी क्र. ०२२-२५८२३५२८, २५८००६३७, २५८३३८२२.

**ई-निविदा सूचना क्रं. १६/२०२४.**

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे अंतर्गत येत असलेल्या पेण प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील १४ शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात मध्यम आकाराची केळी पुरवठा करणेबाबत

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे हे त्यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना मध्यम आकाराची केळी पूरवठा करणेसाठी नामवंत आणि अनुभवी उत्पादक/ वितरक यांच्याकडून खुल्या स्पर्धात्मक ई-निविदा मागवित आहे.

निविदा कागदपत्रांबाबत व ई-निविदेत भाग घेऊ इच्छुक निविदाकारांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

निविदा फक्त ऑनलाईन स्वीकारल्या जातील. ऑनलाईन निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक ०२.०८.२०२४ ते १६.०८.२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत राहील.

सही/-
**(दीपक कुमार मीना, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे.**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड येथील **दिपक नथुराम पाटील व इतर** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे - दिघाटी, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| कासुबाई नथुराम पाटील<br>दिपक नथुराम पाटील<br>प्रकाश नथुराम पाटील<br>वंदना पुंडलिक पाटील<br>राजश्री बाळकृष्ण पाटील | ४३ | ८ | ०-१०-६०<br>पो.ख. ०-०६-६०<br>**०-१७-२०** | १.६७ |

सबब वर नमूद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वैगरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :- ३१/०७/२०२४**

सही/-
**विजय भगत अॅन्ड असोशिएटस्**
**(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)**
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-अरिवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७०/२ | एकूण क्षेत्र ३-१९-००<br>पैकी ०-८९-७०<br>पो. ख. ०-०६-००<br>**एकूण ०-९५-७०** | २.९८ | **निहाल आझम पानसरे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०१/०८/२०२४**

सही/-
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-आष्टे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७३ | ०-१४-२०<br>पो. ख. ०-०२-५०<br>**एकूण ०-१६-७०** | २.३७ | **यमुना धोंडू गोजे<br>छबीबाई गोपाल राऊत<br>अनिता अनंता म्हसकर<br>वासुदेव धोंडू गोजे<br>संगिता शिवाजी पिंगले<br>वसंत धोंडू गोजे<br>कल्पना दिलीप पाटील** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०१/०८/२०२४**

सही/-
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

### पनवेल महानगरपालिका, पनवेल
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | एम. वाय. शेख, टाटा मेमोरियल सेंटर, अॅक्ट्रेक, खारघर, नवी मुंबई | ०४ साग व ०१ कडुनिंब अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील टाटा मेमोरियल सेंटर, अॅक्ट्रेक, खारघर, नवी मुंबई या भुखंडातील ०४ साग व ०१ कडुनिंब अशी एकूण ०५ झाडे ही शांतीसदन व एसएसपीसीसी प्रकल्पाचे स्थानी रस्ता बांधकाम करणेस अडथळा निर्माण करीत आहेत |
| २ | एम. वाय. शेख, टाटा मेमोरियल सेंटर, अॅक्ट्रेक, खारघर, नवी मुंबई | १६ साग, ०१ जंगली, ०१ विलायती चिंच, ०२ कडुनिंब, ०४ बोर व ०१ रेन ट्री अशा एकुण २५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील टाटा मेमोरियल सेंटर, अॅक्ट्रेक, खारघर, नवी मुंबई या भुखंडातील १६ साग, ०१ जंगली, ०१ विलायती चिंच, ०२ कडुनिंब, ०४ बोर व ०१ रेन ट्री अशा एकुण २५ झाडे ही आयआरओसी ब्लॉक (पार्ट-१) प्रकल्प स्थापीत करणेस अडथळा निर्माण करीत आहेत |
| ३ | मे. अपेक्स रियल्टी तर्फे भागीदार श्री. दिनेश भेरूमल भोजवानी, पत्ताः २२५/२२६ टी. टी. सी. एम. आय. डी. सी.. नेरूळ, नवीन मुंबई. | ०३ सुबाभुळ, ०२निम, ०१ उंबर, ०१ खैर, ०१ विलायती चिंच, ०१ आंबा ०१ पिसोनिया व ०१ जांभुळ अशा एकुण ११ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सव्हे नं. ८०/१, मौजे रोहिंजण, ता. पनवेल, जि. रायगड या भुखंडाच्या अवारातील १५ झाडांपैकी ११ झाडे नवीन इमारत बांधकाम करणेस बाधीत होत आहेत. |
| | अध्यक्ष/सचिव, कुसुम अनंत को - ऑप हौसिंग सोसायटी लि. प्लॉट - नं. १२, एम. सी. सी. एच. सोसायटी, पनवेल. | ०१ उंबर झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कुसुम अनंत को ऑप हौसिंग - सोसायटी लि. प्लॉट नं. १२, एम. सी. सी. एच. सोसायटी, पनवेल या सोसायटीच्या अवारातील ०१ उंबर झाड झुकुण धोकादायक स्थितीत असल्याने पडण्याची शक्यता आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगीच् देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.३३०/३३१/२०२४**
**दिनांक : ०१/०८/२०२४**

**सही/-**
**(स्वरूप खारगे)**
**सहा. आयुक्त (वृक्ष प्रधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

मा. पवार मॅडम कोर्ट

**अर्जदाराचे वकील**
**अॅड. जे.बी. आपटे**
नि. २२/ड

प्रो.जमा.

### जाहीर नोटीस
**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश (व. स्तर) यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ चौकशी अर्ज ८२४/२०२३

१. सौ. राजश्री घनःश्याम पाटील ..... अर्जदार
विरुध्द
श्री. रामदास बामा नवाळी व इतर ..... सामनेवाले

ज्याअर्थी सौ. नागुबाई हिराजी घरत हि दिनांक १३/०९/२०१० रोजी मयत झाली असुन तिचे पत्ती हिराजी कमळया घरत दिनांक १३/०१/२०१७ रोजी मयत झाले आहेत. हिराजी घरत व सौ. नागुबाई घरत यांची एकमेव वारस मुलगी व अर्जदाराची आई माई उर्फ माया अनिल साळुंखे दिनांक १२/०४/२००४ रोजी मयत झाली असुन तिचे पती व अर्जदाराचे वडील अनिल दगडु साळुंखे हे दिनांक ०६/१०/२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार सौ. राजश्री घनःश्याम पाटील (लग्नापुर्वी राजश्री अनिल साळुंखे) रा. मौजे. - कळंबुसुरे, पो. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड पिन ४१० २०६ यांनी मे. कोर्टाकडे सदरहु मयत सौ. नागुबाई हिराजी घरत, यांच्या हिश्याच्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसाचे सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**गाव मौजे- हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अनु.क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | ३४/४ | ०-८०-९०<br>पो.ख. ०-०६-६०<br>०-८७-५० | ११.९४ |
| २ | ३१/४ | ०-८९-१०<br>पो.ख. ०-०४-०<br>०-९३-१० | १३.६७ |

त्यापेक्षा सदरहु अर्जदार वर नमुद सदरहु सर्व मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीरनोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजुन हे कोर्ट सदरहु अर्जदाराला त्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत सौ. नागुबाई हिराजी घरत, हिराजी कमळ्या घरत, माई उर्फ माया अनिल साळुंखे व अनिल दगडु साळुंखे सर्व मयत यांचे वारसास सर्टिफिकेट देईल. तारीख १६/०६/२०२४ माहे. ........सन २०२४

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, पनवेल

# उरण तालुक्यात शेतमजुरांचा तुटवडा

## शेती क्षेत्रही होतेय दिवसागणिक कमी



**उरण : प्रतिनिधी**

औद्योगिक विकासामुळे उरण तालुक्यातील शेती क्षेत्र दिवसागणिक कमी होत आहे. एकेकाळी भाताचे कोठार म्हणून उरण तालुक्याची ओळख होती, मात्र आजच्या घडीला या शेतीप्रधान तालुक्यात शेती करणारे मजूर मिळणं दुरापास्त झाले आहे त्यामुळे, कोणी मजूर देतंय का? मजूर म्हणत गावोगावी शेतीमालकांवर भटकण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे यामुळे इतरांची शेतजमीन तीन हिस्से देऊनदेखील कोणी कसायला येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

शेतीच्या कामासाठी वेगवेगळी अत्याधुनिक यंत्रे आली आहेत, मात्र तरीही मजुरांचीच गरज लागतेच, परंतु शेतीच्या कामांसाठी उरण तालुक्यात मजूर मिळत नसल्याने शेती पडीक ठेवण्याची शेतकऱ्यांवर वेळ आली आहे. पूर्वी रोजगारांची साधने कमी असल्याने सहज मजूर उपलब्ध होत असत. दिवसभर उन्हा पावसात मेहनतीची कामे कशाला करायची? म्हणून मजूर शेतीच्या कामाला नकार देत आहेत.

मजुरांअभावी शेतकरी हतबल झाले आहेत. दिवसेंदिवस महागाईत वाढ होत असून उपलब्ध मजुरांनी त्यांची मजूरी वाढवली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना जगणे अवघड होत आहे. सध्या तालुक्यात पेरणीची लगबग सुरू असून, पेरणी झाल्यानंतर भात लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात मजुरांची गरज भासते ३०० ते ४०० रुपये मजुरी त्याशिवाय सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे मासळी, मटन-चिकन चे जेवण, शाकाहाराचा वार असल्यास दोन-तीन भाज्या पापड लोणचे वरण भात भाकरी असे जेवण मजुरांना द्यावे लागते, त्यासोबत दुपारी तीन नंतर चहा नाश्ता करून मजुरांना द्यावा लागतो. विशेष म्हणजे गावोगावी मजूर मिळत नसल्याने इतर गावातील मजुरांना येण्या-जाण्यासाठी उतार खर्चदेखील द्यावा लागतो. त्यामुळे आता शेती करणे शेतकऱ्यांना कठीण होऊन बसले आहे. अशी प्रतिक्रिया उरण तालुक्यातील शेतकरी देत आहेत.

अवजारे बियाणे यांची वाढती महागाई त्याचबरोबर मजुरांचा त्रास यामुळे शेतकरी मेटाकुटीला येत आहेत. ही परिस्थिती उरण तालुक्यातील पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे,आवरे, पानदिवे, खोपटे, कोप्रोली, जुई, कळंबुसरे,चिरनेर, भोम, टाकीगाव, वेशवी, विंधणे, दिघोडे, या ग्रामीण भागात सुरू आहे. अनेक गावातील लोक मजुर म्हणून आदिवासी बांधवांना बोलवत असून, काही मजूर पेण तालुक्यातीलदेखील येत आहेत.

वाढती मजुरी बी बियाणांचे भाव त्याचप्रमाणे कमी होत चाललेली हंदा पद्धत यामुळे शेती करण्यासाठी मजुरांची गरज भासत आहे. यामुळे पूर्वी अर्ध्याने इतरांना दिली जाणारी शेती सद्यस्थितीत तिसऱ्या हिस्स्याने देखील कोणी घेत नसल्याचे निदर्शनास येत आहे. अर्ध्या हिस्स्यामध्ये पूर्वी शेतात येणार पीक शेतमालक व हिस्सेदार यांच्यात अर्धे-अर्धे वाटले जात असे सद्यस्थितीत कोणी शेती घेत नसल्याने तीन वाटे शेती करणाऱ्याला व एक वाटा शेती मालकाला देण्यात येतो, मात्र इतके असूनही मजूर मिळत नसल्याने उरण तालुक्यातील शेती अवघडच होऊन बसली आहे.

हंदा पध्दत लुप्त होत असल्याने शेती क्षेत्र होतंय कमी होऊन दशक भरापूर्वी उरण तालुक्यातील मुख्य व्यवसाय शेती हाच होता. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात हंदा पद्धत सुरू होती. हंदा म्हणजे समूहाने शेती करणे, हंदा पद्धतीमध्ये महिला व पुरुषांचा एक समूह असतो या समूहात जवळपास आठ, दहा, पंधराजण असतात, यामध्ये एका स्त्रीला स्वयंपाकाची जबाबदारी दिली जाते, इतर जण शेतीच्या कामासाठी मदत करतात, हंदा पद्धतीत समूहातील व्यक्ती एकमेकांकडे शेतीसाठी मदत करण्यास जातात यामध्ये कोणत्याही पद्धतीची मजुरी दिली जात नाही व शेतीची कामे देखील लवकर लवकर उरकली जातात, मात्र सध्या उरण तालुक्यात ही हंदा पद्धत लुप्त होत चालली आहे. त्याचाच परिणाम शेतीवर होत आहे व येथील शेती क्षेत्र कमी होत आहे.

> **आता आधुनिकीकरण होऊन देखील पूर्वीसारखी शेती करणे सोप्प राहील नाही, सद्यस्थितीत मजूर मिळत नसल्याने, आम्ही पेण तालुक्यातील दादर गावातून मजूर घेत असून त्यांना दोन वेळचा नाष्टा एक वेळेस जेवण तीनशे ते चारशे रुपये मजुरी त्याचबरोबर येण्या जाण्यासाठी उतार खर्च देतो.**
> **-देवकीबाई म्हात्रे,**
> **शेतकरी, सारडे, उरण**

# आदिवासी पाड्यांमधील नागरी सुविधांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील आदिवासी पाडयांमधील आदिवासी बांधवांच्या समस्या व पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेऊन त्याठिकाणी आवश्यक सोयी, सुविधा देण्याची कार्यवाही करणेकरिता समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली वन हक्क समिती सदस्यांची चौथी बैठक नमुंमपा मुख्यालयातील विशेष समिती कक्षात झाली.

बैठकीस बेलापूर ते दिघा अशा आठ विभागांतील समिती सदस्य असलेले समाजविकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तसेच समाजविकास अधिकारी, आठही विभागांचे उपअभियंता (विद्युत, मलनि:स्सारण, स्थापत्य, पाणीपुरवठा) आणि स्वच्छता अधिकारी, समाजविकास विभागातील संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच ऐरोली विभाग वन हक्क समिती अध्यक्ष बाळू वाघे, कोपरखैरणे वन हक्क समिती अध्यक्ष रमेश डोळे, बेलापूर वन हक्क समिती राजश्री कातकरी, माजी नगरसेवक रामकृष्ण बेंड्या कातकरी, दिघा वन हक्क समिती अध्यक्ष जिव्या बाबल्या डांगरे, नंदा वाघे, श्रमजीवी संघटना, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष, विकास बोंबाडे, रेश्मा कातकरी, सदस्य श्रमजीवी संघटना, ठाणे आदी सदस्य उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान समाजविकास विभागाचे उपायुक्तांनी समिती सदस्य यांनी मांडलेल्या बाबींचा आढावा घेऊन आदिवासी पाडयांमध्ये सोयीसुविधा पुरविणेबाबत संबंधित विभागातील वनहक्क समिती सदस्य असलेले उपअभियंता व स्वच्छता अधिकारी यांना निर्देश दिले. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे सूचित केले.

त्याचप्रमाणे या वेळी महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आदिवासी पाडयामधील नागरिकांमध्ये जनजागृती करून जास्तीत जास्त पात्र लाभार्थी भगिनींना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी नियोजनबध्द कार्यवाही करणे याविषयी उपायुक्तांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीमध्ये आठही विभागांतील उपअभियंता व स्वच्छता अधिकारी यांनी संबंधित आदिवासी पाडयामध्ये सोयीसुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करून त्याबाबतचा प्रगती अहवाल वेळोवेळी उपायुक्त, समाजविकास विभाग यांना सादर करण्यात येईल असे सांगितले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार वन हक्क समितीमधील सूचनांच्या माध्यमातून आदिवासी पाड्यांमधील सेवासुविधांना गती देण्यात येत आहे.

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि. १) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास उपायुक्त कैलास गावडे, लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, मुख्यअग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# लायन्स रिजनचा सामूहिक पदग्रहण सोहळा



**पनवेल : वार्ताहर**

रिजन ३ चे रिजन चेअरमन सुयोग पेंडसे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात रिजन ३ मधील कामोठे, पनवेल रत्न, एन एम सेंटेनरी आणि वुमेन्स वॉरियर्स या चार क्लबचा नवीन संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा नुकताच गोखले सभागृह, पनवेल येथे मोठ्या उत्साहात झाला.

या कार्यक्रमात कामोठे क्लबचे अरुणा सावंत, पनवेल रत्नचे रीनाक्षी बौथियाल, एन एम सेंटेनरी संजय श्रीवास्तव आणि वुमेन्स वॉरियर्स रेखा घरत यांनी आपल्या संचालकमंडळासोबत अध्यक्ष म्हणून पदग्रहण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्रांतपाल एन आर परमेश्वरन उपस्थित होते. त्यांनी नवीन संचालक मंडळाला आपल्या कामाच्या जबाबदाऱ्या सांगून पदग्रहण शपथ दिली. याच कार्यक्रमात विविध क्लबच्या १५ नवीन सभासदांना डिस्ट्रिक्ट अडमिनिस्ट्रेशन कमिटीचे अनुप थरवानी यांनी सभासदत्व शपथ दिली. सर्व नवनिर्वाचित अध्यक्षांनी येत्या वर्षात घेण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमानंतर रिजन ३ मधील सर्व सभासदांना द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक यांनी अत्यंत सुलभ भाषेत आणि सर्व सभासदांना सहभागी करून प्रश्नोत्तरे स्वरूपात लायन्स क्लब विषयी विस्तृत माहिती दिली कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिजन चेअरमन सुयोग पेंडसे यांनी केले तर आभार रिजन समन्वयक संजय गोडसे यांनी मानले.

या कार्यक्रमाला डिस्ट्रिक्टचे मिलिंद पाटील, रमाकांत म्हात्रे, विजय गणात्रा, एएसएन मूर्ती, प्रदीप भट्टाचार्य, संगीता म्हात्रे, सीताराम चव्हाण तसेच रिजनमधील सर्व क्लबचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरभी पेंडसे, स्वाती गोडसे, मानदा पंडित यांनी परिश्रम घेतले.

# पनवेल मनपा आयुक्तांशी समस्यांबाबत चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन पालिका हद्दीतील विविध नागरी समस्यांसंदर्भात काही मुद्द्यांकडे लक्ष वेधले. समस्या सोडवण्यासाठी पालिका प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन पनवेल महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिले.

पालिकेच्या विविध प्रभागातील प्रलंबित कामे आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याबाबत या वेळी चर्चा झाली. शहराच्या विविध प्रभागातील विकास कामे आणि प्रलंबित प्रश्न तसेच प्रभागातील इतर समस्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तासमोर मांडल्या.

खारघर शहरातील समस्या शहर अध्यक्ष बळीराम नेटके यांनी तर कामोठे शहरातील विविध समस्या अजिनाथ सावंत यांनी मांडल्या.

या वेळी मुश्ताक पटेल, हबीब शेख, श्रीकृष्ण मुंढे, अरूणा घाडगे, नितीन म्हात्रे, विलास खरटमोल, आदेश पाटील, अजित पाटील, चांद (भाभी) शेख, अमोल देशमुख, मुनाफ शेख, मकसूद शेख यांच्यासह मोठ्यासंख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# अवधेश महतो यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम; मान्यवरांकडून शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश महतो यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी गुरुवारी (दि. १) साजरा करण्यात आला. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्यांचे अभीष्टचिंतनही केले.

महतो यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, दातांची तपासणी शिबिर राबविण्यात आले. उलवेमधील वॉचमनकरीता छत्री वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप उत्तर भारतीय मोर्चा उलवे अध्यक्ष मंजुल शुक्ला, सामाजिक कार्यकर्ते अवनीश सिंह, महेश कुमार, भरत गुप्ता, धीरज कुमार, संकल्प घरत, अजय हेगटकर आदी उपस्थित होते.



# लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त परिसंवाद

## सीकेटी महाविद्यालयात उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने गुरुवारी (दि.१) लोकमान्य टिळक यांच्या १०४ व्या पुण्यतिथीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी इतिहासविभाग प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, त्यानंतरसर्व विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस अभिवादन केले. त्यानंतरपरिसंवाद सत्रामध्ये इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनचरित्रावर, त्यांच्यासामाजिक, राजकीयकार्यावर प्रकाश टाकला.



यामध्ये भूमिका सुतार (तृतीय वर्ष), दिशा शिंदे(तृतीय वर्ष), नूतन पाटील (प्रथम वर्ष), गायत्री लालगे (प्रथम वर्ष) यांनी विशेष सहभाग घेतला तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी लोकमान्य टिळकाच्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाचे महत्व सांगून टिळकांच्या योगदानाचे आणि त्यांच्या विचारांचेआजच्या युगातील महत्त्व पटवून दिले. या परिसंवादामध्ये इतिहास विभागातील ८२ विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. भावेश भोईर यांनी केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो.डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

# प्राचार्य राजेंद्र पालवेंचा सत्कार



**कळंबोली : बातमीदार**

सुधागड शाळा अन संकुलातील माझे सर्व सहकारी ही माझी उर्जा आहे. या मुळेच मी विविध पदांवर कार्य करू शकत आहे हे कार्य करतांना सर्वांच्या हिताचे व योग्य निर्णय घेऊ शकतो. आज सुधागड विद्या संकुलाच्या वतीने जो माझा सन्मान केला हा सन्मान भविष्यात अधिक कामे करण्यास प्रेरणा व ऊर्जा देणारा असा आहे, असे प्रतिपादन कळंबोलीतील सुधागड विद्यासंकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी सत्कार समारंभाच्या वेळी केले.

कळंबोलीतील सुधागड विद्यासंकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांची रायगड जिल्हा विद्या सेवक पतसंस्थेच्या अध्यक्षपदी नेमणूक झाल्याबद्दल सुधागड विद्या संकुलाच्या सर्व विभागाच्या वतीने विभाग प्रमुखांच्या हस्ते सत्कार करण्यात आहे.

या सत्काराच्या वेळी उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख सुनील पाटील, उपमुख्याध्यापक सुरेश शिंदे, पर्यवेक्षिका अनिता पाटील, पुनम कांबळे, पर्यवेक्षक बाबूराव शिंदे, धर्मेंद्र दिक्षित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील, इंग्रजी माध्यमाच्या प्रमुख कल्पना कुळकर्णी, पूर्व प्राथमिक हिंदी विभागाचे प्रमुख दिनेश पाटील, कार्यालयीन प्रमुख बीना कडू तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**नवी मुंबई :** महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरूळ विभागांतर्गत घर क्र.२०७/२०८ यांचे पाचव्या व सहाव्या मजल्यावर विनापरवानगी अनधिकृतरित्या बांधकाम सुरू होते. ८ मे २०२४ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

कारवाई विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १५ मजूर, एक मुकादम, चार ब्रेकर, दोन गॅसकटर, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक, नेरूळ स्थानिक पोलीस यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

निवडक

## प्रभाकर मसुरे यांना पुरस्कार



**माणगाव** : येथील ज्येष्ठ पत्रकार तथा तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे यांना अविष्कार फाऊंडेशन संस्थेतर्फे राज्यस्तरीय आदर्श पत्रकार गौरव पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे यांनी दिली. प्रभाकर मसुरे हे गेली अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण लेखणीने समाजाला भेडसावणारे विविध प्रश्न, समस्या मार्गी लावून जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. त्यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शिक्षिका कुंदा फुलगावकर सेवानिवृत्त



**नागोठणे** : रोहा येथील कोएसोच्या मेहेंदळे हायस्कूलमधील ज्येष्ठ शिक्षिका कुंदा फुलगावकर या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर बुधवारी (दि.३१) निवृत्त झाल्या. मेहेंदळे हायस्कूलच्या सेवकवृंदांनी त्यांचा निरोप समारंभ आयोजित केला होता. या वेळी कुंदा फुलगावकर यांचे पती संजय फुलगावकर, मुली, जावई, नातवंडे, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच प्राचार्य रमेश मोसे, ज्येष्ठ शिक्षक नारायण पानसरे, किशोर पाटील, शिक्षक प्रतिनिधी सुनील कोकळे, सेवकवृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्ती फुलगावकर मॅडम यांच्या आठवणींचा उजाळा देत कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर शाळेतील सर्व सेवकवृंदाच्या वतीने त्यांना भेटवस्तू व सन्मानपत्रक देऊन गौरविण्यात आले.

## शासकीय रिक्त जागा ऑनलाईन भरणार

**रायगड** : सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राथमिक शिक्षण पदविका (D.El.Ed.) प्रथम वर्षाच्या शासकीय कोट्यातील ऑनलाईन प्रवेशाच्या एकूण तीन फेऱ्या घेण्यात आल्या. तथापि अद्याप शासकीय कोट्यातील जागा रिक्त असल्याने त्या विशेष फेरीद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल प्राचार्य डॉ. सुभाष महाजन यांनी दिली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य पद्धतीने प्रवेश होईल. यासाठी विद्यार्थी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज करु शकतीत. याबाबत सविस्तर सूचना, प्रवेश नियमावली व अध्यापक विद्यालयनिहाय रिक्त जागा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्याने अध्यापक विद्यालयाची निवड करून लगेचच प्रवेशपत्राची स्वतःच्या ई-मेलमधून प्रिंट घ्यावयाची आहे व त्यानंतर अध्यापक विद्यालयात चार दिवसांच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश घ्यावयाचा आहे.

# खालापुरात लाडकी बहीण अर्ज पडताळणी सुरू

**खोपोली** : प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पात्र बहिणींच्या खात्यात रक्षाबंधन सणाला लाभार्थी रक्कम जमा व्हावी, यासाठी खालापूर पंचायत समिती कार्यालयातून २४ तास अर्ज पडताळणी सेवा वरिष्ठ गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या देखरेखीखाली सुरू झाली आहे. खालापूर तालुक्यातून ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन पद्धतीने २७ हजार ४६३ अर्ज शासनाला प्राप्त झाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महायुती सरकार लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलेच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करणार आहे. सर्वत्र या योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळत असून खालापूर तालुक्यातून ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन पद्धतीने २७ हजार ४६३ अर्ज शासनाला प्राप्त झाले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जांच्या पडताळणीचे काम सध्या सुरू आहे.



अर्ज पडताळणीचे काम जलद गतीने पूर्ण व्हावे यासाठी खालापूर पंचायत समितीचे वरिष्ठ गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी पंचायत समिती कार्यालय स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे. ऑनलाईन पद्धतीचे अर्ज पडताळणीसाठी तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील डाटा ऑपरेटर सध्या स्वतंत्र कक्षात बसून अर्ज पडताळणीचे काम करीत आहेत.

या ठिकाणी स्वतंत्र संगणक, टॅब याची सोय असल्याने पडताळणी प्रक्रियेला वेग आला आहे.

याशिवाय ऑफलाईन पद्धतीने आलेल्या अर्जदेखील ऑनलाईन नोंद करून त्याची देखील पडताळणीचे होणार असल्याने तालुक्यातील पात्र लाडक्या बहिणीला रक्षाबंधनला योजनेचा लाभ मिळणार आहे.

**खालापूर पंचायत समिती कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असून ऑनलाईन पद्धतीचे अर्ज पडताळणी होणार आहे हे काम वेगवान पद्धतीने पूर्ण करण्यासाठी तीन पाळ्यांमध्ये कर्मचारी काम करीत आहेत.**

**-संदीप कराड,**
**वरिष्ठ गटविकास अधिकारी, खालापूर पं. स.**

## खांब येथे जोडरस्त्याच्या उड्डाणपुलाचे कठडे कोसळले

**धाटाव** : प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गावरील खांब येथे बांधण्यात आलेल्या जोडरस्त्याच्या उड्डाणपुलावरील कठडे बुधवारी (दि.३१) ढासळले. उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्याने या मार्गावरील वाहतूक दोन-तीन दिवसांनी सुरू होणार होती, मात्र त्या आधी उड्डाणपुलावरील संरक्षक कठडे हे ढासळून ते सर्व्हिस रोडवर कोसळले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

बुधवारी सायंकाळच्या सुमारास उड्डाणपुलाचे संरक्षक कठडे खाली सर्व्हिस रोडवर कोसळले. यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ठेकदराने तत्काळ ते कठडे आणि माती बाजूला करून मार्ग मोकळा केला. या परिसरातून खांब बाजारपेठ आहे, तसेच खांब नाक्यावरून मुंबईकडे तसेच कोलाड, इंदापूर, माणगाव, महाडकडे प्रवास करणारे प्रवासी प्रवास करतात.

चौपदरीकरणाच्या कामात येथे जोडरस्ता उड्डाणपुलाचे काम करण्यात आले, मात्र ते निकृष्ट दर्जाचे असल्याने या पुलावरूनदेखील पाणी पाझरत आहे. पुलाखालून जा-ये करणाऱ्या नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.



## पेण येथे भाजपतर्फे भजन स्पर्धा रंगणार

**पेण** : प्रतिनिधी

पेण विधानसभा मतदारसंघ भाजपतर्फे भजनामृत भजन स्पर्धा २०२४ वारकरी भजन आणि संगीत भजन स्पर्धा आयोजित करण्यात आले आहेत. ही स्पर्धा ५ ते ७ ऑगस्टदरम्यान हॉटेल सौभाग्य इन मेगा हॉल, गणपती वाडी येथे होणार आहे.

आमदार रवीशेठ पाटील यांच्या संकल्पनेतून माजी आमदार धैर्यशील पाटील, रायगड भाजप लोकसभा प्रमुख सतीश धारप यांच्या संकल्पनेतून भजनामृत भजन स्पर्धा २०२४चे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेत प्रथम क्रमांक ५१ हजार, द्वितीय क्रमांक ४१ हजार, तृतीय क्रमांक ३१ हजार, चतुर्थ क्रमांक २१ हजार, इतर बक्षिसे प्रत्येक विजेत्या मंडळास आकर्षक सन्मानचिन्हासह सन्मानपत्र देण्यात येईल, तसेच भजन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भजन मंडळात उत्तेजनार्थ ५००० तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व गायकांना बक्षीस देण्यात येतील, अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी दिली.

भजन स्पर्धेत नोंदणी करण्यासाठी जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील (९१५८९१६२७५), वैकुंठ पाटील (८३९००९९९९९), पेण तालुका सरचिटणीस संजय डंगर (९२२७१६१९५५) नाव नोंदणीसाठी यांना संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## धान्य वितरण त्वरित सुरू करण्यासाठी निवेदन

**मुरूड** : प्रतिनिधी

तालुक्यातील धान्य दुकानदारांचे सर्व्हर गेल्या २२ दिवसांपासून डाऊन असल्याने धान्य वितरण व्यवस्था कोलमडली आहे. याचा मोठा फटका शेकडो शिधापत्रिकाधारकांना बसला आहे. त्यामुळे दोन दिवसांत ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण करून दिलासा द्यावा याकरिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.



तालुक्यात १७ हजार २७५ शिधापत्रिकाधारक आहेत. त्यांना ऑनलाईन पद्धतीने महिन्याला महिना धान्य वितरण केले जाते. जुलै महिना संपला तरी शिधापत्रिकाधारकांना धान्य वाटप झाले नाही. सध्या पावसाचे दिवस आहेत. सर्व्हर डाऊन असल्याने आदिवासी बांधव रेशनिंग दुकानावरून धान्य न घेता परतत आहेत. त्यामुळे येत्या दोन दिवसांत शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरण करावे, अशी मागणी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केली आहे.

## महसूल पंधरवडा उपक्रमाचा शुभारंभ

**चौक** : प्रतिनिधी

सर्वसामान्य महिलेचा सन्मान करण्याचा प्रामाणिक प्रयत्न हे सरकार करीत असून बचत गटाचे अनुदान वाढविण्याचे काम याच सरकारने केले, असे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व महसूल पंधरवडा हा संयुक्त कार्यक्रम पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व महसूल पंधरवडा कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते झाले.




ते पुढे म्हणाले, पुरुषांच्या बरोबरीत स्त्रिया असल्या पाहिजेत, त्या सबळ आणि सक्षम होण्यासाठी राज्य सरकारने या योजना राबविण्यासाठी ही योजना आणल्याचे त्यांनी सांगितले. महिलांचा विकास झाला तर देशाचे उत्पन्न वाढेल आणि देशाचा विकास होईल, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालविकास प्रकल्प अधिकारी प्रवीण पाटील यांनी केले. या वेळी तहसीलदार आयुब तांबोळी व गटविकास अधिकारी संदीप कराड यांनीही मार्गदर्शन केले.कार्यक्रमास उपअभियंता चव्हाण, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याणी मोरे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजपूत, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विकास पवार,विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, महादेव शिंदे, संजीव चोपडे, बचत गट अध्यक्ष, सदस्य, अंगणवाडीसेविका, मदतनीस, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे यांनी खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड व तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या कार्याचा विशेष गौरव केला.

खालापूर तालुक्यात वय वर्ष २१ ते ६५ वयोगटातील एकूण ३३१०२ महिलांची संख्या असून ऑनलाईन २७,६७८ अर्ज भरण्यात आले असून ४७५० ऑफलाईन अर्ज भरण्यात आले असल्याची माहिती महिला व बालकल्याण अधिकारी आरती तेलखडे यांनी दिली.

## रायगडात जुलैअखेर वार्षिक सरासरीच्या ६३.२ टक्के पाऊस

**पाली** : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यात जुलै महिन्यात मुसळधार पाऊस कोसळला आहे. जिल्हा नैसर्गिक आपत्तीबाबत दैनंदिन अहवालात मिळालेल्या पावसाच्या अहवालानुसार सोमवारी (दि.२९)पर्यंत जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या ६३.२ टक्के पर्जन्य झाले असल्याची नोंद आहे. येथील २८ लघु प्रकल्पांपैकी २३ लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. आत्तापर्यंत १७४७ नागरिक स्थलांतरित आहेत.

जिल्ह्यात वार्षिक सरासरी ३१४८.६० मिमी इतका पाऊस पडतो. जुलै अखेर पर्यंत जिल्ह्यात १९८८.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या ६३.२ टक्के पर्जन्य झाले आहे. ही स्थिती दिलासादायक आहे.

## विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रूजवावी

### अतिरिक्त महासंचालक योगिंदर सिंग यांचे आवाहन

**माणगाव** : प्रतिनिधी

एनसीसीमुळे स्वयंशिस्त राष्ट्रप्रेम, कठोर परिश्रम व व्यक्तिविकास हे गुण वाढीस लागतात. हे विद्यापीठ अतिशय वेगळे व तांत्रिक असूनसुद्धा येथे एनसीसीची मुळे खोलवर रुजली आहेत. यापुढे या विद्यापीठाच्या सलग्नीत महाविद्यालयांत देखील एनसीसीच्या शाखा सुरू कराव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत व्हावी, असे आवाहन अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगिंदर सिंग यांनी कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांना बहाल करण्यात आलेल्या मानद कर्नल या मानाच्या व प्रतिष्ठेच्या पदवी समारंभात बोलताना केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांना प्रतिष्ठेची असलेली मानद कर्नल पदवी बहाल करण्यात आली, असून हा पीपिंग पदग्रहण सोहळा सोमवारी (दि.२९) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्रेक्षागृहात झाला.

हा मानद पदवी विशिष्ट सेवा पदक मिळवलेले व्हीएसएम अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगिंदर सिंग यांच्या हस्ते बहाल करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यकारी परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण सरदेशमुख यांनी मनोगत व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल योगिंदर सिंग व कुलगुरू यांना धन्यवाद दिले.

कुलगुरू यांचे अभिनंदन करून विद्यापीठ परिवाराला अभिमान वाटावा, असा क्षण असल्याचे नमूद केले. याच बरोबर राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती वाढीसाठी एनसीसी गरजेचे आहे. याबाबत आपले विचार मांडले.

कार्यक्रमानंतर एनसीसीच्या विद्यार्थ्यांचा सुंदर कार्यक्रम झाला त्यानंतर विद्यापीठातील प्राध्यापिका डॉ. गीतांजली महामुणकर आणि त्यांची मुलगी शर्वरी यांनीदेखील राष्ट्रभक्तीवर गीतावर नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमिला पडवळ यांनी केले.

## रातवडच्या विद्यार्थ्यांनी घेतला वनविहाराचा आनंद

**माणगाव** : प्रतिनिधी

तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे विद्यार्थी बुधवारी (दि.३१) बिनदप्तराच्या शाळेत रमले. विद्यालयात वर्षा सहल, वनविहाराचे आयोजन करण्यात आले होते.



निसर्गरम्य व जैवविधतेने समृद्ध असा शालेय परिसर असून नैसर्गिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी परिसरातील विविध फुलझाडांचे, रानभाज्यांचे, वनस्पतींचे निरीक्षण केले. पर्यावरण निरीक्षण झाल्यावर मैदानात कबड्डी, फुटबॉल, विविध साधनांचे खेळ खेळून मनसोक्त पावसात भिजण्याचा आनंद घेतला. परिसरातील वृक्ष, वेली व रानभाज्यांची माहिती घेतली, तसेच विविध प्रकारचे दगड, गोटे जमा केले. परिसर पाहणी व खेळून झाल्यावर सर्व विद्यार्थ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला. पंगत मांडून हस्यविनोदात सर्व विद्यार्थ्यांनी भोजनाचा आनंद घेतला.

भोजनानंतर वर्गवार गीत गायन, नकला व विविध सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. वनविहारासाठी सहल प्रमुख राजेंद्र भगत व सर्व शिक्षकांनी नियोजन केले. मुख्याध्यापक गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाने व सहल विभागाच्या नियोजनातून वर्षा सहल व बिनदप्तराची शाळा उत्साहात झाली.

## माथेरानमधील महावितरणविरोधातील उपोषण स्थगित

**माथेरान** : प्रतिनिधी

माथेरानमधील मागील दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या विद्युत समस्या व त्यामुळे येथे वारंवार खंडित होणारा विद्युतपुरवठा या संदर्भात महावितरणविरोधात होणारे उपोषण स्थगित केले आहे.

माथेरान शहराकरिता अनेक प्रकल्प मंजूर झाले असल्याने उपोषण मागे घेतले असल्याची माहिती भाजप कार्यकर्ते तथा माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेने अध्यक्ष संतोष कदम यांनी दिली.

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरात मागील दोन महिन्यांपासून नादुरूस्त रोहित्रामुळे शहराचा विद्युतपुरवठा खंडित वारंवार खंडित होत होता. येथील विद्युत समस्यांमुळे पर्यटन व्यवसाय धोक्यात आला आहे, तसेच ई-रिक्षा चार्जिंग होत नसल्याने शालेय विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत होती.



शहरातील या विद्युत समस्यांबाबत माथेरान भाजपचे कार्यकर्ते तथा निसर्ग पर्यटन संस्थेचे अध्यक्ष संतोष कदम यांनी बुधवारी (दि.१) उपोषणाचा इशारा दिला होता, मात्र महावितरण माथेरान शहर सहाय्यक अभियंता संतोष पारधी यांनी कदम यांची प्रत्यक्ष भेट घेऊन माथेरानसाठी अनेक योजना मंजूर झाल्याचे कर्जत उपअभियंता प्रकाश देवके यांचे पत्र दिले.

योजना आगामी कामात राबविल्या जाणार असून वीजसमस्या आणि अन्य समस्या या पूर्णपणे सोडविल्या जातील, असे सांगितल्याने कदम यांनी उपोषण स्थगित केले आहे. या वेळी भाजप शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव व निसर्ग पर्यटन संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**नेरळ स्विचिंग स्टेशन ते माथेरान दस्तुरीपर्यंत नवीन कोवेड कंडक्टर लाईन प्रस्तावित आहे, तसेच नेरळ ते दस्तुरीपर्यंत उच्चदाब भूमिगत वीज वाहिनीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांच्या सूचनेनुसार बनवण्यात आलेले आहेत. माथेरान फिडरवर झाडांच्या फांदी छाटणी व देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात आल्यामुळे यापुढे वीजपुरवठ्यासंबंधी तक्रारी उद्भवणार नाही.**

**-संतोष पारधी, सहाय्यक अभियंता, महावितरण, माथेरान**

# आयपीएलमध्ये ‘अनकॅप्ड’ खेळाडूंची संख्या वाढणार

## सुधारित नियमांना मंजुरी मिळण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) बहुप्रतीक्षित बैठकीमध्ये इंडियन प्रीमियर लीगच्या फ्रेंचाइजी प्रमुखांसह मेगा लिलावापूर्वी रिटेंशन कायम ठेवण्याबाबत वानखेडे स्टेडियम संकुलातील बोर्डाच्या मुख्यालयात चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. अनकॅप्ड (आंतरराष्ट्रीय क्रिकेट न खेळलेले) खेळाडूंची संख्या वाढविण्यावरही जोर देण्यात आल्याची माहिती मिळाली.

या बैठकीत रिटेंशनची संख्या पाच ते सहा असावी, मेगा लिलाव दर पाच वर्षांनी व्हावा, पर्समध्ये वाढ करण्यात यावी, खेळाडूंना कामगिरीवर आधारित वाढ तसेच अनकॅप्ड खेळाडूंच्या संख्येत वाढ करण्यात यावी यावर मत मागविण्यात आले. माहितीनुसार फ्रेंचाइजींना किमान दोन अनकॅप्ड खेळाडू वेगळ्या स्लॉटमध्ये ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकते. अनेक संघांनी गेली दोन तीन वर्षे अनकॅप्ड खेळाडूंवर मेहनत घेतल्याने त्यांना ते गमावू इच्छित नाही.

मुंबईने नेहल वढेरा, नमन धीर व आकाश मधवाल यांच्यावर मेहनत घेतली आहे. कोलकाताकडे वैभव अरोरा, रमणदीप सिंग व सुयश शर्मा आहेत. पंजाबकडे हरप्रीत ब्रार, आशुतोष शर्मा, शशांक सिंग व प्रभसिमरन सिंग आहेत. चेन्नईकडे मुकेश चौधरी, सिमरजीत सिंग व समीर रिझवी तर हैदराबाद संघात नितीशकुमार रेड्डी, अब्दुल समद, बंगळुरूकडे यश दयाल, विजयकुमार विशाक, अनुज रावत व महिपाल लोमरोर आणि लखनोंकडे मयंक यादव व मोहसीन खान असे गुणवान ‘अनकॅप्ड’ खेळाडू आहेत.

**असे असू शकतात सुधारित नियम**

फ्रेंचाइजींना पाच किंवा सहा खेळाडूंना रिटेन करण्याची परवानगी मिळू शकते. संघांना ‘अनकॅप्ड’ खेळाडूंना अतिरिक्त स्लॉटमध्ये ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकते. इम्पॅक्ट खेळाडू नियम कायम राहण्याची शक्यता आहे. प्रत्येक संघासाठी एक आरटीएम (राइट टू मॅच) उपलब्ध असू शकतो. फ्रेंचाइजींच्या पर्समध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. मेगा लिलाव दर पाच वर्षांनी होऊ शकतो.

# रेड रन स्पर्धेत यश म्हात्रे, पौर्णिमा म्हात्रे प्रथम



**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी प्रकल्प संचालक यांच्या आदेशानुसार आणि रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड यांच्यामार्फत रेड रन या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन अलिबाग येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलांमध्ये यश दत्ताराम म्हात्रे, तर मुलींमध्ये पौर्णिमा हेमंत म्हात्रे या दोन्ही जेएसएम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. उद्घाटन समारंभास निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, पोलीस निरीक्षक किशोर साळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर महाजन, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, असिस्टंट मेट्रन अनिता भोपी, जेएसएम कॉलेजचे प्रा. प्रवीण गायकवाड, पीएनपी कॉलेजचे प्रा. कैलाससिंग प्रतापसिंग, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला, तपस्विनी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमी सिस्टर इन्चार्ज मालती मोकल, नोडल अधिकारी डॉ. दीपक गोसावी उपस्थित होते.

स्पर्धेत मुलांमध्ये द्वितीय क्रमांक कृतार्थ (सनी) पाटील पीएनपी. कॉलेज व तृतीय क्रमांक देवांग दयानंद राऊत जेएसएम कॉलेज यांनी पटकाविला. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणप्रत्र देण्यात आले.

स्पर्धा सुरळीत होण्याकरिता जिल्हा सहाय्यक रवींद्र कदम, रश्मी सुंकले, संपदा मळेकर, आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित सोनवणे, गणेश सुतार, समुपदेशक कल्पना गाडे, रामेश्वर मुळे, अक्षय बेरड, वाहनचालक अतिश नाईक, महेश घाडगे, क्लिनर रूपेश पाटील, मंगेश पिंगळा, रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञ हेमकांत सोनार यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वागत, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनाची जबाबदारी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी बजावली.

# गोव्यातील मॅरेथॉनमध्ये उरणच्या प्रेम ठाकूरला रौप्यपदक

**उरण : वार्ताहर**



रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट ऑफ पोरव्होरिम गोवा यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या रोटरी रेन रन मॅरेथॉनमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचा प्रेम संतोष ठाकूर या विद्यार्थ्याने रौप्यपदक पटकाविले. त्याने २१ किमी अर्ध मॅरेथॉनमध्ये यश मिळविले.

प्रेम ठाकूरला जिमखाना प्रमुख डॉ. विलास महाले, देवेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, प्राचार्य डॉ. पी.जी. पवार यांनी प्रेमचे अभिनंदन केले.

# माजी क्रिकेटपटू अंशुमन गायकवाड यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटच्या मैदानात परिस्थितीत कितीही विपरीत असली तरी हार न मानणारे भारताचे दिग्गज माजी क्रिकेटपटू-फलंदाज अंशुमन गायकवाड यांची कॅन्सरशी झुंज मात्र अपयशी ठरली. रक्ताच्या कर्करोगामुळे त्यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. अंशुमन गायकवाड यांनी ४० कसोटी व १५ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्याशिवाय त्यांनी भारतीय संघाचे प्रशिक्षक व राष्ट्रीय निवड समिती सदस्य म्हणूनही भूमिका बजावली.



अंशुमन गायकवाड यांच्यावर लंडनमध्ये गेल्या काही काळापासून रक्ताच्या कर्करोगासाठी उपचार चालू होते. गेल्याच महिन्यात ते भारतात परत आले. त्यांच्यावरील उपचारांसाठी बीसीसीआयने नुकतीच एक कोटी रुपयांची आर्थिक मदत केली होती. त्याशिवाय १९८३ सालच्या भारतीय विश्वचषक विजेत्या संघातील खेळाडूंनीही उपचारांसाठी त्यांना आर्थिक मदत केली होती.

जलदगती गोलंदाजांसमोर पाय रोवून उभे राहत अंशुमन गायकवाड यांनी जगभरातल्या अनेक तेजतर्रार गोलंदाजांचा यशस्वीपणे सामना केला. यामध्ये त्यांनी थेट अंगावर अनेक गोलंदाजांचे वेगवान चेंडू झेलले. यामुळे त्यांना अनेकदा जखमाही झाल्या, पण त्यांचा अभेद्य बचाव भेदणे वेगवान अनेक दिग्गज गोलंदाजांसाठी महाकठीण कर्म ठरले. गायकवाड यांच्या निधनामुळे क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली आहे.

# आयपीएल टीम मालकांमध्ये जोरदार वादावादी

## मेगा ऑक्शनवरून दोन गट पडले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुढील वर्षी होणाऱ्या आयपीएल २०२५साठी बीसीसीआयच्या मुख्यालयात आयपीएलच्या सर्व टीम मालकांची बैठक बोलविण्यात आली होती. यामध्ये मेगा ऑक्शनपूर्वी खेळाडूंना टीममध्ये ठेवण्याबाबतच्या नियम आणि संख्येवर चर्चा होणार होती. यावरून टीमच्या मालकांमध्ये एवढी वादावादी झाली की आता मालकांचे दोन गट पडले आहेत. यामुळे बीसीसीआयची डोकेदुखी वाढली आहे.

या बैठकीत मेगा ऑक्शनची गरज आणि भविष्य याच विषयावर वाद सुरू झाले आणि पुढे चर्चा गेलीच नाही. काही टीम मालकांमध्ये जोरदार वादावादी झाल्याचे वृत्त आहे. यामध्ये शाहरूख खान, काव्या मारन यांचाही समावेश असल्याचे समजते आहे. यानंतर बीसीसीआयने येत्या काळात आम्ही आमचा निर्णय कळवू असे टीम मालकांना सांगून बैठक संपविली.

अनेक टीमच्या मालकांनी मेगा ऑक्शन नकोच अशी भूमिका घेतली होती. यामध्ये सर्वात पुढे कोलकाताचा मालक शाहरूख खान आणि सनरायझर्सची मालक काव्या मारन होती. दोन्ही संघ यंदा आयपीएलच्या फायनलमध्ये पोहचले होते. या दोघांनाही आपली टीम आहे तशीच ठेवायची आहे. टीमला ब्रँड बनविणे आणि फॅंससोबत जोडण्यासाठी स्थिरतेची गरज असल्याचे कारण या दोघांनी दिले होते.

यावरून नेस वाडिया आणि शाहरूख खान यांच्यात वाद झाला. शाहरूखने बैठकीत मोठ्या आवाजात वाद घातल्याचे बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले. पंजाब किंग्सचा मालक वाडिया याच्यासोबत खेळाडू रिटेन करण्याच्या संख्येवरून शाहरूखने वाद घातला. यावर वाडिया यांनी असा कोणता वाद झाला नसल्याचे म्हटले आहे.

या वादात शाहरूखला काव्या मारनची साथ मिळाली. आम्हाला मेगा नको तर छोटा लिलाव हवा आहे. एखादी टीम बनविण्यासाठी खूप वेळ लागतो. युवा खेळाडूंना चांगला प्लेअर बनण्यासाठी वेळ लागतो. अभिषेक शर्माला चांगले प्रदर्शन करण्यासाठी तीन वर्षे लागल्याचे सांगत काव्यानेही शाहरूखच्या म्हणण्याला साथ दिली. यानंतर जोरदार वाद सुरू झाला.

# आंतरराष्ट्रीय घोडेस्वारी स्पर्धेत जय सरभवालला ‘रौप्य’

**बेल्जियम : वृत्तसंस्था**



युरोपमधील बेल्जियम येथे नुकत्याच झालेल्या घोडेस्वारीच्या शर्यतीत भारताच्या १४ वर्षांच्या मुलाने कमाल केली. सीएसआय १ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताच्या जय सिंग सभरवाल याने दुसरा क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ४० देशांमधून एकूण ६३ घोडेस्वारांनी सहभाग घेतला होता.

जय सिंग सभरवाल हा भारताचा एक उदयोन्मुख घोडेस्वार आहे. जयला घोडेस्वारीचे लहानपासूनच आकर्षण होते. त्यामुळे वयाच्या पाचव्या वर्षापासूनच त्याने घोडेस्वारीचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेत त्याने घोडेस्वारीतच आपले करिअर घडवण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून त्याने अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आणि यश मिळवले.

वयाच्या पाचव्या वर्षापासून घोडेस्वारीचे शिक्षण घेणाऱ्या जय सिंग सभरवालने १२व्या वर्षी आपल्या आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा गाठला आणि तो आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करू लागला. तेव्हापासून अवघ्या दोन वर्षात त्याने अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला असून विविध स्तरावर यश प्राप्त केले आहे.

# पॅरा जलतरणपटू जिया रायने पार केली इंग्लिश खाडी

**लंडन :** मुंबईतील रहिवासी असलेली १६ वर्षीय जिया राय हिने सर्वात तरुण आणि वेगवान पॅरा जलतरणपटू म्हणून इंग्लिश खाडी पार करून कौतूकास्पद कामगिरी केली आहे. २८ ते २९ जुलैदरम्यान तिने हा अविश्वसनीय पराक्रम पूर्ण केला.

पीटीआयच्या वृत्तानुसार या तरुण जलतरणपटूने इंग्लंडमधील बॉट क्लिफवरून आपला प्रवास सुरू केला आणि फ्रान्समधील पॉइंट दे ला कोर्ट-डून येथे ती पोहचली. १७ तासांच्या प्रभावी वेळेत ३४ किलोमीटरचे अंतर कापले आणि २५ मिनिटे २८ ते २९ जुलैदरम्यान तिने हा अविश्वसनीय पराक्रम पूर्ण केला.




# सारा तेंडुलकरच्या अदांनी चाहते क्लिन बोल्ड



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटचा चेहरा अर्थात सचिन तेंडुलकरची लेक सारा तेंडुलकर नेहमी चर्चेत असते. ती नवनवीन फोटो शेअर करून चाहत्यांच्या संपर्कात राहते. आता सचिनच्या लेकीने एका कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले आहेत. साराचा हा ग्लॅमरस लूक चाहत्यांना भुरळ घालत आहे.

काळ्या ड्रेसमध्ये साराचा बोल्ड अवतार सर्वांचे लक्ष वेधत आहे. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची लेक सारा ही काही अभिनेत्री नसली तरी तिची बी टाऊनमध्ये चर्चा असते. सारा दिसायला खूपच सुंदर असून ती काही जाहिरातींमध्ये झळकली आहे. ती अनेक ब्रँड्सची अॅंबेसिडरही आहे.

बॉलिवूडमध्ये स्टारकिड्ससोबत सारा अनेकदा दिसते. त्यामुळे सिनेमा न करताही साराची बीटाऊनमध्ये चर्चा असते. अलीकडेच समोर आलेल्या एका व्हिडीमुळे साराच्या बॉलिवूड डेब्यूची चर्चा रंगली. शूटिंग सेटवरील तिचा व्हिडीओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये ती खूपच क्युट दिसत आहे.

केवळ स्पोर्टिंग आयकॉनची लेक म्हणूनच नाहीतर सारा तिच्या वैयक्तिक कर्तृत्वाने सर्वांना भुरळ घालते. ती एक ऑनलाइन स्टोअर चालवते आणि अलीकडेच तिला भारतातील कोरियन ब्युटी ब्रँड लॅनिगची ब्रँड अॅम्बेसेडर म्हणून नियुक्त करण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com